अतारांकित प्रश्नोत्तरांची १२ वी यादी

महाराष्ट्र विधानसभा
तिसरे अधिवेशन, २०२५

अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी
प्रश्नांची एकूण संख्या - ५०

खडकवासला (जि.पुणे) येथील जलसंधारण विभाग व छोटे पाटबंधारे विभागांमध्ये निकृष्ट दर्जाची कामे होत असल्याबाबत

(१) ९९९ (२४-०४-२०२५). श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकवासला (जि.पुणे) मतदारसंघातील जलसंधारण विभाग व छोटे पाटबंधारे विभागाची कामे निकृष्ट दर्जाची होत असून ही कामे कागदावरच पूर्ण केल्याचे निदर्शनास आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामे ही लोकप्रतिनिधींना विश्वासात न घेता करण्यात येत असून उक्त कामांच्या नियोजनासाठी लोकप्रतिनिधींचा समावेश करण्याबाबत कोणती उपाययोजना केली आहे,

(३) असल्यास, सदर कामे निकृष्ट दर्जाची होऊनही कंत्राटदारांना कोट्यवधी रुपयांची देयके मंजूर करण्यात येत आहेत तसेच जलसंधारण व छोटे पाटबंधारे विभागातील कामांचे लेखापरीक्षण व तांत्रिक निरीक्षण नियमित होण्यासाठी कोणत्या उपायोजना करण्यात आल्या आहेत,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने उक्त विभागातील अनियमितता टाळण्यासाठी तसेच सार्वजनिक निधीचा योग्य विनियोग सुनिश्चित करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय राठोड (१८-०७-२०२५) : (१) हे खरे नाही.

(२)) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३)) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४)) प्रश्न उद्‌भवत नाही.

(५)) प्रश्न उद्‌भवत नाही.

कामठी (जि.नागपूर) रोड येथील संजय गांधी मैदानावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय अतिविशेषचार, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्था हा वैद्यकीय प्रकल्प उभारणेबाबत

(२) १८७४ (२८-०४-२०२५). डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्तर नागपूर येथील नागरीकांना उत्तम आरोग्यसेवा देण्यासाठी शासनाने २५ वर्षापूर्वी सन १९९९ मध्ये कामठी रोड येथील संजय गांधी मैदानावर डॉ.बाबासाहेब आंबेडकर अतिविशेषचार, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्था हा वैद्यकीय प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला असून त्यास मंजूरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १३ ऑक्टोबर,२०२१ रोजीच्या शासन निर्णयानुसार एकूण रु. ११६५.६५ कोटीच्या प्रस्तावास मान्यता देऊन नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA) मार्फत बांधकाम करण्यास मंजूरी दिली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA)यांनी ८७५ खाटांचे रुग्णालय सुरु करण्यासाठी सुधारीत रु.८०५.३१ कोटीचा अंदाजपत्रक दिनांक २१ जून,२०२४ रोजी वा त्यासुमारास शासनास सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावाची शासनाने माहिती घेऊन व निधीची तरतूद करुन या रुग्णालयाचे काम तातडीने सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१६-१०-२०२५) : (१) व (२) होय, हे खरे आहे.
मौजा इंदोरा या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकर अतिविशेषोपचार, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संस्था ६१५ खाटांचे रुग्णालय या प्रकल्पाच्या बांधकामाकरीता दि.०५.१२.२०२३ रोजीच्या शासननिर्णयान्वये रु.५७५.७९ कोटींची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली असून सदर प्रकल्प राबविण्याकरीता नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (NMRDA) पुर्वीचे नागपूर सुधार प्रन्यास कार्यान्वीत यंत्रणा म्हणुन मान्यता देण्यात आली आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर काम नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामार्फत सुरु आहे.
(५)) प्रश्न उद्भवत नाही.

कोरडेचीवाडी (ता.केज, जि. बीड) येथील तलावास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत

(३) २२१९ (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरडेचीवाडी (ता.केज, जि. बीड) येथील प्रस्तावित साठवण तलावास पाणी उपलब्धता प्रमाणपत्र उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केल्याने सदर प्रस्ताव धोरणात्मक निर्णयासाठी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे जिल्हा जलसंधारण अधिकारी, बीड यांनी दिनांक १४ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यादरम्यान पत्रान्वये सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय राठोड (२३-०७-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) या विभागाच्या नस्ती क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.२२८/जल-१ वर पाणी उपलब्धता प्रमाणपत्र अंतर्गतचा प्रस्ताव "ड" विशेष बाब म्हणून जलसंपदा विभागास सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

मौजे निलज (जि.भंडारा) येथे सौर उपसा सिंचन योजना सुरु करणेबाबत

(४) २३५४ (१९-०४-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निलज (जि.भंडारा) येथील शेतकऱ्यांना सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्याकरीता सौर उपसा सिंचन योजनेचे भूमीपूजन दिनांक ३० मे, २०१९ रोजी वा त्यासुमारास करण्यात आले असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मृद व जलसंधारण विभागाने सन २०१८ मध्ये शासन निर्णय निर्गमित करुन रुपये १.५५ कोटी इतक्या खर्चाच्या या योजनेसाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली परंतू अद्यापपर्यंत काम सुरु झाले नसून योजना कागदावरच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्यानुषंगाने सदर योजना ही तातडीने सुरु करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय राठोड (२३-०७-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४)

सदर योजनेकरीता शासन निधी अंतर्गत शासन निर्णय दि.१४.०८.२०१८ अन्वये एकूण रुपये १,५५,८५,७१३/- ची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर कामाचे कार्यारंभ आदेश देण्यात आले. तथापि, सदर योजनेच्या Rising Main च्या सरेखेत खाजगी मालकीची जमीन असल्यामुळे शेतकऱ्यांनी आंदोलन करुन काम करुन देण्यास अडथळा केल्यामुळे सदर काम थांबविण्यात आले. त्यामुळे सदर कामाचे करारनामा रद्द करण्यात आला.

तसेच, सदर प्रकल्पाच्या Rising Main चे सरेखेत (Alignment मध्ये) बदल झाल्याने प्रकल्पाच्या संकल्पन व रेखाचित्रामध्ये होणाऱ्या बदलानुसार सदर कामाचे नव्याने अंदाजपत्रक तयार करण्यात आलेली असून महाव्यवस्थापक, महाऊर्जा कार्यालय, भंडारा यांचेकडून सौर पॅनेलचे अंदाजपत्रक प्राप्त करुन घेऊन अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात येईल.

अमरावती जिल्हा परिषदेतील कर्मचारी संघटनेच्या मागण्यांबाबत

(५) २५७० (२४-०४-२०२५). श्री.रवी राणा (बडनेरा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद अमरावती येथील कर्मचारी संघटना रजिस्टर नंबर -२५७/८९ च्या महिला हक्क संरक्षण समितीच्या अध्यक्ष यांनी त्यांच्या मागण्या जिल्हा आरोग्य अधिकारी यांना निवेदनाद्वारे सादर केल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती यांनी उक्त निवेदन ग्रामविकास विभागास दिनांक १८ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यासुमारास केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त नमूद मागण्या मंजूर करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांना शिफारस केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली काय, चौकशीच्या अनुषंगाने अनेक आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (०८-१०-२०२५) :(१), (२) व (३) होय, हे खरे आहे.
(४) मा.प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांना अमरावती, जि.प.आरोग्य कर्मचाऱ्यांच्या मागण्या शासनाकडून मान्य करण्यासंदर्भात दि.१८.१२.२०२४ रोजी निवेदन दिले आहे. या मागण्यांबाबत लोकप्रतिनिधीनी मा.मुख्यमंत्री महोदयांना दि.१२.२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर मागण्या मंजूर करण्याबाबत विनंती केली आहे. सदर मागण्या या धोरणात्मक स्वरुपाच्या आहेत, जसे, आरोग्य सहायक पदाची वेतन त्रुटी दूर करण्याबाबत, १० वर्षे पूर्ण झालेल्या आरोग्य सेविका यांना कालबद्ध पदोन्नतीसाठी आवश्यक LHV प्रशिक्षणाची अट काढून टाकण्याबाबत, आरोग्य सेवक (पु./स्त्री.) यांचे मूळ वेतन समान, मात्र पदोन्नतीनंतर आरोग्य सहायक/सहायिका या पदावर वेतन निश्चिती होत असताना तफावत पडत असून ती दूर करणेबाबत, कायम प्रवास भत्ता, जोखीम भत्ता, हार्डशिप भत्ता यांमध्ये वाढ करणेबाबत इ. सदर मागण्या या धोरणात्मक स्वरुपाच्या असल्याने आवश्यक निर्णयाप्रत येण्यासाठी शासन स्तरावर कार्यवाही सुरु आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील विविध मागण्यांबाबत

(६) २५९४ (२८-०४-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अंबाजोगाई (जि.बीड) येथील स्वामी रामानंदतीर्थ वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयात रुग्णासाठी ५१८ खाटा मंजूर आहेत. तथापि, येथे उपचारासाठी येणाऱ्या आंतररुग्ण व बाह्यरुग्ण रुग्णांची संख्या जास्त असल्याने अपुरी खाटांची संख्या व रिक्त पदामुळे तेथे रुग्णांची गैरसोय होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांनी सदर संस्थेत आवश्यक पदनिर्मिती व वाढीव रुग्णखाटांचा प्रस्ताव मंजुरीसाठी सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, यांचेकडे सादर केला आहे तसेच उक्त प्रस्तावांना मंजुरी देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री यांच्याकडे दिनांक १३ नोव्हेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर संस्थेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त गठित करण्यात आलेल्या सुवर्ण महोत्सव २०२४-२५ समितीने आवश्यक कामांचा परिपूर्ण अहवाल शासनास सादर केला असून त्यात बांधकाम विषयक बाबींचे अंदाजित खर्चाचे रुपये १५६.१९ कोटी इतक्या रकमेचे अंदाजपत्रक तसेच बहुउद्देशीय सभागृह येथे १००० आसन व्यवस्थेसह सभागृहात ध्वनी व प्रकाश योजनेची कामे, अंतर क्रीडा प्रकारासाठी क्रीडासंकुलासाठी SAI (Sport Autoriti of India) यांच्या मानांकनानुसार आवश्यक सुविधेसह क्रीडासंकुल तयार करणे, यासह विभागवार आवश्यक यंत्रसामग्री स्वतंत्र प्रस्ताव सादर करणे इ.बाबींचा समावेश आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, संस्थेच्या सुर्वर्णमहोत्सवी वर्ष साजरा करण्याकरीता सादर करण्यात आलेल्या सर्व प्रस्तावांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री व सचिव, वैद्यकीय शिक्षण, मुंबई यांच्याकडे दिनांक ३१ ऑगस्ट, २०२२, दिनांक २२ जानेवारी, २०२३ व दिनांक १५ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास ,उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१९-०९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

अंबाजोगाई (जि. बीड) येथील स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व ग्रामीण रुग्णालयात मंजूर खाटांच्या तुलनेत रुग्णांची संख्या जास्त आहे. त्यानुषंगाने वाढीव पदनिर्मिती करण्याचे प्रस्तावित आहे. सद्य:स्थितीत उपलब्ध मनुष्यबळाअभावी रुग्णसेवेची गैरसोय होणार नाही याची संस्थास्तरावर उपाययोजना करण्यात येतात.
(२) हे खरे आहे.
(३) व (४) यासंदर्भात संस्थास्तरावरुन प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने संचालनालयाने प्रस्तावातील त्रुटींची पुर्तता करण्याबाबत अधिष्ठाता यांना कळविले आहे.
(५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात व्यावसायिकांनी एमआयडीसीकडून घेतलेल्या भूखंडांवर उद्योग सुरु न केल्याबाबत

(७) २८१३ (१७-०४-२०२५). श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्री.आनंद तिडके (नांदेड दक्षिण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बऱ्याच ठिकाणी जिल्हा, तालुकास्तरावर एमआयडीसीच्या जागा उपलब्ध असून त्यामध्ये बऱ्याच व्यावसायिकांनी भूखंड आरक्षित केले असून तेथे अद्यापही कोणत्याही प्रकारचा उद्योग व्यवसाय सुरू न केल्यामुळे नवीन उद्योजकांच्या संधी कमी होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दोन वर्षांपूर्वी आरक्षित केलेल्या एमआयडीसीच्या जागांवर उद्योग सुरु न झाल्यामुळे त्याचा परिणाम सरकारी उत्पन्नावर होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील स्टार्टअप उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने "स्टार्टअप धोरण" राबविण्याचा निर्णय माहे जानेवारी, २०२५ मध्ये घेतला असून या धोरणा अंतर्गत राज्यातील स्टार्टअपसाठी आवश्यक नोंदण्या, परवानग्या आणि प्रमाणपत्र देण्यासाठी 'एक खिडकी योजना' सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त धोरणाचे स्वरूप काय आहे,
(५) असल्यास, राज्यात एमआयडीसी मधील आरक्षित केलेल्या भूखंडावर उद्योग व्यवसाय सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (२७-०६-२०२५) : (१) हे खरे नाही.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिपत्याखालील औद्योगिक क्षेत्रामध्ये प्रवर्ग निहाय २,३ व ५ वर्षाचा (अ, ब, क, ड) विकास कालावधी दिला जातो.

सदर विकास कालावधीमध्ये मंजूर नकाशाप्रमाणे नियोजित इमारतीचे बांधकाम पूर्ण करुन इमारत पुर्णत्वाचा दाखला (BCC) प्राप्त करुन उत्पादनात जाणे आवश्यक असते. तथापि, मंजूर नकाशाप्रमाणे विकासात्मक कार्यवाही केल्यास व भूखंड धारकाची विनंती प्राप्त झाल्यास महामंडळाचे प्रचलित धोरणानुसार

मुदतवाढ देण्यात येते.

तसेच वाटप केलेल्या भूखंडाचा मुळ व वाढीव विकास कालावधी संपुष्टात आल्यानंतर म म.औ.वि. महामंडळाच्या नियमानुसार पंचनामा करुन भूखंड परत घेण्याची कार्यवाही केली जाते.

(२) खरे नाही.

म.औ.वि. महामंडळाच्या दिनांक १२/०५/२०२३ रोजीच्या धोरणानुसार दोन वर्षापूर्वी वाटप केलेल्या भूखंडांचा विकास कालावधी शिल्लक आहे.

(३) व (४) होय, हे खरे आहे.

म.औ.वि. महामंडळाने राज्यातील नविन उद्योगांच्या आवश्यक नोंदण्या प्रमाणपत्र व इतर परवानग्या देण्यासाठी एक खिडकी योजना (SWC) सुरु केली आहे. सदर धोरणातंर्गत एकूण १८ लोकसेवा येतात.

(५) म.औ.वि. महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील आरक्षित भूखंडावर उद्योग सुरु करण्यासाठी म.औ.वि.महामंडळाकडून शासनाच्या महा ई-टेंडर संकेत स्थळावर तसेच दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करुन आरक्षित रिक्त भूखंड वाटपासाठी उपलब्ध करुन दिले जातात.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

कुंबेफळ (ता.केज,जि.बीड) येथे एमआयडीसी मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव

(८) ३०५० (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंबेफळ (ता.केज,जि.बीड) तालुक्यातील गायरान जमिनीवर एमआयडीसी (MIDC) मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या उच्चधिकार समिती समोर सादर करून मंजुरी देणे बाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. उद्योग मंत्री यांच्याकडे दिनांक १२ ऑगस्ट,२०२४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे. हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (२७-०६-२०२५) : (१) होय हे खरे आहे.

स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे सदर निवेदन दि.०३.०९.२०२४ रोजी मऔवि महामंडळास प्राप्त झाले आहे.

(२) प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रासाठी मौजे-कुबेफळ खु.,ता.केज,जि.बीड येथील १२.०० हे.आर सरकारी क्षेत्राची दि.१६.०१.२०२४ रोजी स्थळपाहणी करण्यात आली आहे.

प्रस्तावित औद्योगिक क्षेत्रालगतच्या औद्योगिक क्षेत्रातल भूखंड वाटपाचा दर, उपलब्ध भूखंड, भूखंडांना येणारी मागणी तसेच प्रस्तावित औद्योगिक क्षेत्राची सुसाध्यता पडताळणीची कार्यवाही पुर्ण झाल्यानंतर सदर क्षेत्रास मऔवि अधिनियम,१९६१ अन्वये कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करण्याकरीता प्रस्ताव उच्चाधिकार समितीसमोर विचारार्थ सादर करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यातील तालुका सुविधा केंद्राचे कामकाज कंत्राटी कामगारामार्फत चालविला जात असल्याबाबत

(९) ३३७२ (२४-०४-२०२५). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कामगार कल्याण मंडळाची स्थापना सन २०११ मध्ये होऊन १४ वर्षानंतरही राज्यातील ३५८ तालुका सुविधा केंद्राचा कामकाज कंत्राटी कामगार (खाजगी व्यक्ती/ संस्था) मार्फत चालविला जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे नोंदणीकृत कामगारांना सुविधा देण्याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असून दलालांचा फायदा होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कामगार मंडळामध्ये शासकीय कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर (०३-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

इमारत व इतर बांधकाम व्यवसायामधील बांधकाम कामगारांच्या हिताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने, केंद्र शासनाने इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार विनियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ लागू केला आहे. सदर अधिनियमाच्या कलम १८ अन्वये महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. या मंडळामार्फत नोंदणीकृत बांधकाम कामगारांना विविध कल्याणकारी योजनांच्या लाभाचे वाटप केले जाते.

मंडळाचे कामगार सुरळीतपणे पार पाडण्यासाठी दिनांक ०३.१०.२०१२ रोजीच्या शासन निर्णयानुसार मंडळाकरिता एकूण ५६ पदाची निर्मिती करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांची दैनंदिन संख्या वाढत असल्यामुळे तालुकास्तरावरील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभ वाटपास गती देण्याकरीता व कामगारांच्या सुविधेकरीता सन २०२४-२५ मध्ये राज्यातील ३५८ तालुके व अतिरिक्त १२ ठिकाणी अशी एकूण ३७० तालुका सुविधा केंद्र कार्यान्वित करण्यात आली असून सुविधा केंद्रातील सर्व कामकाज पुरवठादार संस्थेकडून कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या मनुष्यबळामार्फत चालविले जाते. सर्व तालुका सुविधा केंद्रांच्या कामकाजावर संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा कार्यालय प्रमुखांचे लगतचे नियंत्रण असते.

(२) हे खरे नाही.

(३) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने मंडळाच्या दि.०२.०७.२०२४ रोजी पाडलेल्या ६० व्या बैठकीतील ठराव क्र.६० (२६)/२०२४ अन्वये मंडळ मुख्यालय व क्षेत्रिय स्तरावर कामकाजासाठी ८१३ पदांच्या सुधारीत आकृतीबंधास मंडळाच्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली आहे. त्यास अनुसरुन पुढील आवश्यक कार्यवाही प्रगती पथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

केज (जि.बीड) येथील जलसंधारण विभागातंर्गत नवीन बंधाऱ्यांच्या प्रस्तावांना मंजुरी देणेबाबत

(१०) ३६४१ (०५-०५-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केज (जि.बीड) येथील जलसंधारण विभागातंर्गत नवीन बंधाऱ्यांचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणात मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात आले आहेत,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून किती नवीन बंधाऱ्यांच्या प्रस्तावांना मंजुरी दिली व त्यासाठी किती रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय राठोड (२३-०७-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) बीड जिल्हा केज तालुक्यातील वरपगाव को.प.ब. क्र. १० ता.केज या योजनेस रक्कम रु. १५९.३२ लक्ष किंमतीच्या प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुक्ताईनगर (ता.बोदवड,जि. जळगांव) येथे भूजल संधारणासाठी निधीची तरतूद करणेबाबत

(११) ३९८२ (२४-०४-२०२५). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुक्ताईनगर (ता.बोदवड,जि. जळगांव) हा कायम दुष्काळी तालुका असल्याने उन्हाळयात शेती तसेच पिण्याच्या पाण्याची गंभीर समस्या होत असल्याने सदर दुष्काळी परिसराचा विकास करण्याकरिता विशेष बाब म्हणून भूजल संधारणासाठी कोल्हापूर बंधारा पध्दती सारखे प्रकल्प राबविण्याकरिता शासनाने निधीची तरतूद करणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी संबंधित विभागाकडे वारंवार केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मागणीच्या अनुषंगाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्यानुसार उक्त निधीची तरतूद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय राठोड (२९-०७-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) मुक्ताईनगर मतदार संघातील मुक्ताईनगर व बोदवड तालुक्यात अतुर्ली व कुऱ्हा परिसरातील तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरलेल्या ० ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेचे सन २०२०-२०२१ व २०२२-२०२३ आर्थिक वर्षात अनुक्रमे ६३ व १४ असे एकुण ७७ गेटेट सिंमेट कॉंक्रीट बंधारे यांचे कामास तसेच रु. ३१.३९ कोटी एवढ्या रकमेची प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार निविदेनंतर रु.२८.२९ कोटी एवढया रकमेचे कार्यारंभ आदेश देण्यात आले सद्य:स्थितीत काम सुरु असून प्रस्तुत कामावर रु.९.४४ कोटी खर्च झाला आहे.

जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत मुक्ताईनगर तालुक्यात १५ व बोदवड तालुक्यात ११ नाला खोलीकरणाच्या कामांना एकुण ३२.९० लक्ष रुपयाची प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. सदर कामांची निविदा पुर्ण झाली असुन कामे सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

सहाय्यक कामगार आयुक्त (राज्य) चंद्रपूर कार्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत

(१२) ४१६० (२४-०४-२०२५). श्री.करण देवतळे (वरोरा) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सहाय्यक कामगार आयुक्त (राज्य), चंद्रपूर कार्यालयातील सहाय्यक कामगार आयुक्त हे पद माहे जानेवारी, २०२३ पासून रिक्त असून सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार सरकारी कामगार अधिकारी, नागपूर यांचेकडे तद्नंतर सहाय्यक कामगार आयुक्त, गोंदिया यांचेकडे अतिरिक्त प्रभार सोपविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) चंद्रपूर जिल्हा सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयातंर्गत चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्याचा कार्यभार असून, चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक क्षेत्र असल्याने कामगारांच्या समस्या नेहमीच निर्माण होत असतात, अशा परिस्थितीत गेल्या दोन वर्षापासून रिक्त जागेवर प्रभारी म्हणूनच सहाय्यक कामगार आयुक्त व सरकारी कामगार अधिकारी यांचे जबाबदारी सोपविल्यामुळे कामगारांचे प्रश्न सुटण्यास अडचणी निर्माण होत आहेत तसेच

संबंधित अधिकारी पूर्णवेळ कामावर नसल्याने कामगारांचे प्रश्न वेळेत सुटत नसल्यासचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू रिक्त पदे भरण्याबाबतची मागणी भारतीय मजदूर संघ विदर्भ प्रदेश विभाग, चंद्रपूर यांनी मा.मुख्यमंत्री, मा.कामगार मंत्री, मा.कामगार राज्यमंत्री, प्रधान सचिव, कामगार विभाग, कामगार आयुक्त, मुंबई, अप्पर कामगार आयुक्त विदर्भ विभाग, नागपूर यांचेकडे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर कार्यालयातील सहाय्यक कामगार आयुक्त व सरकारी कामगार अधिकारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत व कामगारांचे प्रश्न वेळेत सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर (२५-०७-२०२५) : (१) होय, हे अंशत: खरे आहे.
श्री.अ.सु.पाटील, परिविक्षाधीन सहायक कामगार आयुक्त यांना दि.२१.०३.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सहायक कामगार आयुक्त, चंद्रपूर या पदाचा स्वतंत्र कार्यभार देण्यात आला होता. तद्नंतर, श्री.प्र.भि.कावळे, सहायक कामगार आयुक्त यांची दि.३०.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये नियतकालिक बदलीने सहायक कामगार आयुक्त कार्यालय, चंद्रपूर येथे पदस्थापना करण्यात आली आहे.
(२) हे खरे नाही.
(३) होय, हे खरे आहे.
(४) श्री.अ.सु.पाटील, परिविक्षाधीन सहायक कामगार आयुक्त यांना दि.२१.०३.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सहायक कामगार आयुक्त, चंद्रपूर या पदाचा स्वतंत्र कार्यभार देण्यात आला होता. तद्नंतर, श्री.प्र.भि.कावळे, सहायक कामगार आयुक्त यांची दि.३०.०५.२०२५ रोजीच्या आदेशान्वये नियतकालिक बदलीने सहायक कामगार आयुक्त कार्यालय, चंद्रपूर येथे पदस्थापना करण्यात आली आहे.
चंद्रपूर कार्यालयाकरिता सरकारी कामगार अधिकारी यांची ०२ पदे मंजूर असून सदर दोन्ही पदांचा अतिरिक्त कार्यभार अनुक्रमे श्री.श्रीराम मस्के, परि. सरकारी कामगार अधिकारी व श्री.मनिष खंडाईत, अधिक्षक यांच्याकडे दि.०८.०७.२०२५ रोजीच्या आदेशान्वये सोपविण्यात आला असून कामगारांचे प्रश्न वेळेत सोडविण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

नाशिक येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न रुग्णालय इमारत बांधकाम प्रस्तावास मान्यता देणेबाबत

(१३) ४२८७ (२८-०४-२०२५). ॲड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) म्हसरूळ (जि.नाशिक) येथील आरोग्य विज्ञान विद्यापीठ येथे १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय व संलग्न ४३० खाटांचे (सुधारित ६५० खाटांचे) स्थापन करण्याबाबत दिनांक १० फेब्रुवारी, २०२१ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकित मान्यता देण्यात आली आहे , हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याअनुषंगाने शासन निर्णय क्र.एमईडी -२०२० /प्र.क्र २१/२०/ शिक्षण-१ दि.०५ एप्रिल २०२१ नुसार इमारत बांधकाम व इतर बांधकामासाठी एकूण ३८३.११ कोटी खर्चास अंशत मान्यता प्रदान करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील प्रकल्पास इमारत बांधकाम प्रस्तावास अधिकचा निधी आवश्यक असल्याने सुधारित ६९० कोटीचा प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने वैद्यकीय शिक्षण विभागास दिनांक २ मे, २०२४ रोजी वा त्यासुमारास सादर केला आहे, हे ही खरे आहे काय ,
(४) असल्यास, सदरील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सलग्न रुग्णालय इमारत बांधकाम व अनुषंगिक कामांना सुधारित मान्यता देण्यासाठी व सदरील कामांची कार्यन्वित यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभागास देण्याबाबत लोकप्रतिनिधी (नाशिक पूर्व) यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १६ डिसेंबर, २०२४ रोजीच्या पत्राव्दारे तसेच मा.वैद्यकीय शिक्षण मंत्री व प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग यांना सन २०२३ व सन २०२४ मध्ये अनेकदा लेखी पत्राव्दारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५)असल्यास, सुधारित प्रशासकीय मान्यता व कार्यन्वित यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभागास देण्याबाबत शासनाने अद्याप पर्यंत म्हणजे माहे फेब्रवारी, २०२५ च्या पहिल्या आठवड्यापर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१९-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) हे खरे नाही
(४) हे खरे आहे.
५) बांधकामाची सुधारित जागा निश्चित झाल्यानंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही

केंद्र शासनाच्या आदेशाप्रमाणे राज्यातील मजुरांच्या वेतनातही वाढ करणेबाबत

(१४) ४३८५ (२४-०४-२०२५). श्री.अमित झनक (रिसोड), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाने दिनांक १ ऑक्टोबर, २०२४ पासून राज्यांना दिलेल्या आदेशानुसार मजुरांना प्रतिदिन ७८३ रुपये देणे बंधनकारक असताना विविध शासकीय यंत्रणांकडे असलेल्या मजूरांना केवळ १८० रुपये देण्याची मंजूरी दिली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले, त्याअनुषंगाने सदर मंजुरांच्या वेतनात केंद्र शासनाने केलेल्या वाढीची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर (०३-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

परंतु, किमान वेतन अधिनियम, १९४८ मधील तरतुदीनुसार राज्यात एकूण ७९ अनुसूचित उद्योग असून त्यापैकी ६७ उद्योगांचे किमान वेतन दर निश्चित करण्यात आले आहे. त्यानुसार त्या-त्या अनुसूचित उद्योगातील कामगारांना किमान वेतन देय ठरते.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही

अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण भागात पाण्याची टाकी उभारणेबाबत

(१५) ४६२६ (२४-०४-२०२५). श्रीमती सुलभा गायकवाड (कल्याण पूर्व) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण भागात मोठया प्रमाणात पिण्याच्या पाण्याची टंचाई असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर ग्रामीण भागात पाण्याची टाकी उभारणेबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री यांच्याकडे दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी वा त्यासुमारास पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने पाण्याची टाकी उभारण्याकरिता अंबरनाथ येथील शासकीय (गुरचरण) जागा उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (०५-०८-२०२५) :(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) जल जीवन मिशन अंतर्गत अंबरनाथ तालुक्यात मंजुर असलेल्या एकूण ४९ योजनांमध्ये ५९ साठवण टाकी मंजूर आहेत. त्यापैकी ३८ टाक्यांचे काम पुर्ण झाले आहे तसेच उर्वरित साठवण टाक्यांचे काम प्रगतीपथावर आहे.

शासकीय (गुरचरण) जागेत टाकी बांधकाम करणेसाठी जागेची आवश्यकता होती. त्या अनुषंगाने संबंधित ग्रामपंचायतीकडून सदर जागेचा ना हरकत दाखला उपलब्ध झाला असून साठवण टाकीचे काम प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

राज्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी जुन्या प्रकल्पांची कायमस्वरूपी दुरुस्ती व देखभालीसाठी नवीन जलसंधारण धोरण आणणेबाबत

(१६) ४७९२ (१९-०४-२०२५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी जुन्या प्रकल्पांची कायमस्वरूपी दुरुस्ती व देखभालीसाठी नवीन जलसंधारण धोरण आणण्यात येणार असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जलसंधारण प्रकल्पांच्या देखभालीसाठी कोणते विशेष तंत्रज्ञान वापरण्यात येणार आहे तसेच पाण्याची उपलब्धता आणि गुणवत्ता वाढविण्यासाठी या धोरणात काही विशेष उपाय समाविष्ट करण्यात येणार आहेत काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर धोरणांची अंमलबजावणी करून निधी उपलब्ध करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय राठोड (२७-०७-२०२५) : (१) हे खरे आहे.

(२) १. शासन निर्णय, दि. १७.०२.२०२१ अन्वये मुख्यमंत्री जलसंवर्धन योजना राबविण्यात आलेली होती. सदर योजनेची अंमलबजावणी करण्याचा कालावधी हा तीन वर्षाचा (एप्रिल, २०२० ते मार्च, २०२३) असुन एकुण ७९१६ योजनांची दुरुस्तीसाठी रु. १३४०.७५ कोटीचा आराखडा मंजुर करण्यात आलेला होता. सदर योजनेंतर्गत मार्च २०२३ अखेर एकुण ४५५३ योजनांच्या रु. ११७७.५२ कोटीच्या दुरुस्ती प्रस्तावांना प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली असुन सदर योजनांची दुरुस्ती क्षेत्रीय स्तरावर प्रगतीपथावर आहे.

२. मृद व जलसंधारण विभागाच्या योजनेचे / संरचनेचे भौगोलिक माहिती प्रणालीवर (GIS) घेण्यासाठी महाराष्ट्र सुदुर संवेदन उपयोजन केंद्र (MRSAC) यांचेसोबत सामंज्यस्य करार करण्यात आलेला आहे. त्यामध्ये नोंदविलेल्या योजनेचे /संरचनेचे शिवार फेरी स्थळ पहाणी करुन पडताळणी (Ground Truthing) मोबाईल ॲपच्या सहाय्याने मॅपिंग करण्यात येणार आहे.

३. त्यानुसार दुरुस्ती आवश्यक असलेल्या प्रकल्पांना प्राधान्यक्रम ठरवून प्रकल्पांची दुरुस्ती हाती घेण्याचे धोरण निश्चित करण्यात येणार आहे.

(३) मृद व जलसंधारण विभागासाठी प्रतिवर्षी अर्थसंकल्पित अंदाजपत्रकात निधी उपलब्ध करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

पुरंदर, (जि. पुणे) येथे होणाऱ्या विमानतळाबाबत

(१७) ४८५३ (२७-०४-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुरंदर (जि.पुणे) येथे आंतरराष्ट्रीय विमानतळ करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून भूसंपादन करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना सन २०१३ च्या भूसंपादन कायद्यानुसार समाधानकारक दर, नोकरी व परतावा देण्याकरिता व समृध्दी महामार्गाप्रमाणे स्वेच्छा खरेदी करण्याबाबत कोणत्या उपाययोजना केल्या आहेत

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (२७-०६-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) शेतकऱ्यांना भूमिसंपादन, पुनर्वसन व पुर्न:स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ मधील कलम २६ ते ३० व महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार मोबदला देण्याची तरतूद आहे.

मा. मुख्यमंत्री महोदयांनी दि.०६.०१.२०२५ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने मुदतीत भूसंपादन पुर्ण करण्याबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुषंगाने पुरंदर (जि.पुणे) येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी २८३२ हे.आर क्षेत्राचे भूसंपादन करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ चे प्रकरण ६ व कलम २ खंड (ग) च्या तरतुदी लागू करण्यास उच्चाधिकार समितीच्या दि.०७. ०२.२०२५ रोजीच्या १७१ व्या बैठकीत दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने दि.०७ मार्च,२०२५ रोजी महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. यानुषंगाने पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

मंगळवेढा (जि.सोलापूर) येथे महात्मा बसवेश्वर स्मारक उभारण्याबाबत

(१८) ४९८२ (२३-०४-२०२५). श्री.अभिजीत पाटील (माढा), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मंगळवेढा (जि.सोलापूर) येथील महात्मा बसेश्वर महाराजांच्या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या स्मारकाला १० वर्षांपूर्वी निधीची घोषणा करूनही अद्याप कोणताही निधी उपलब्ध झाला नसल्याने स्मारकाचे काम प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी तत्कालिन मा.मुख्यमंत्री यांच्याकडे दिनांक १० सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन महात्मा बसेश्वर महाराजाचे स्मारक उभारण्यासाठी निधी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयकुमार गोरे (०३-१०-२०२५) :(१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मंगळवेढा जि. सोलापूर येथे महात्मा बसवेश्वर महाराजांचे स्मारक उभारण्यास शिफारस करण्यासाठी सन २०१७ मध्ये गठित तत्कालीन पालकमंत्री, सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेली समिती रद्द करून, सन २०२२ मध्ये जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली. जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी महात्मा बसवेश्वर स्मारकाचा रु.२५.०० कोटीचा आराखडा या विभागास सादर केला होता. सदर आराखड्यावर मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दि.१९.०७.२०१९ रोजीच्या बैठकीत विचार करण्यात येऊन, स्मारकाचा सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश देण्यात आले होते.

तद्नंतर जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे अध्यक्षतेखालील समितीतील अशासकीय सदस्यांच्या नियुक्तीबाबत काही राजकीय पक्षांनी आक्षेप घेतल्यामुळे, सदर समिती सन २०२२ मध्ये रद्द करण्यात आली.

सद्या विधानसभेतील आश्वासनानुसार, नियोजित स्मारकाच्या उभारणीबाबत शिफारस करण्यासाठी समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्यात असंघटित बांधकाम कामगारांना शासनाने सुरू केलेल्या योजनेचा लाभ मिळविणेबाबत

(१९) ५२२३ (२४-०४-२०२५). श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात असंघटित बांधकाम कामगारांसाठी शासनाने सुरू केलेल्या योजनेचा प्रत्यक्षात काम न करणाऱ्या लोकांनीही दलांलामार्फत लाभ मिळविल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदरहू बाब शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर सध्या तालुका स्तरावर बांधकाम कामगारांची नोंदणी व पडताळणी करण्यासाठी कार्यालये सुरू केली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त बोगस नोंदीमुळे प्रत्यक्षात असलेले कामगार मात्र या लाभापासून वंचित राहिले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले त्यानुषंगाने उक्त बोगस नोंदी रद्द करुन दलालांवर कारवाई करणेबाबत व प्रत्यक्ष कामगारांची नोंद करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर (०३-१०-२०२५) : (१) हे खरे नाही.

राज्यातील बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येत असलेल्या कल्याणकारी योजनांचे लाभ मंडळाकडे नोंदीत होणाऱ्या बांधकाम कामगारांना दिले जातात. मंडळाकडे नोंदणीसाठी संबंधित बांधकाम कामगारास मागील वर्षभरात त्याने किमान ९० दिवस बांधकाम कामगार म्हणून काम केल्याचे प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने केल्या जाणाऱ्या नोंदणी अर्जासोबत सादर करावे लागते. नोंदणी अर्जासोबत जोडलेल्या सर्व कागदपत्रांची छाननी केल्यानंतर निकष पूर्तता करणाऱ्या बांधकाम कामगारांचेच संबंधित नोंदणी अधिकाऱ्यांमार्फत अर्ज मंजूर केले जातात. त्यानंतर बांधकाम कामगारांची नोंदणी करण्यात येते.
(२) मंडळाकडील नोंदीत बांधकाम कामगारांची दैनंदीन संख्या वाढत असल्यामुळे तालुका स्तरावरील बांधकाम कामगारांची नोंदणी, नुतनीकरण व लाभवाटपास गती देण्याकरीता व बांधकाम कामगारांच्या सुविधेकरीता सन २०२४-२५ मध्ये राज्यातील ३५८ तालुके व अतिरिक्त १२ ठिकाणी अशी एकूण ३७० तालुका सुविधा केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या बांधकामास निधी उपलब्ध करून देणेबाबत

(२०) ५२४६ (२८-०४-२०२५). श्री.कैलास घाडगे पाटील (धाराशिव) : सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नसणाऱ्या जिल्ह्यांमध्ये सन २०२१ नंतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित रुग्णालय स्थापन करण्यास शासनाने मंजुरी दिलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास,त्यानुसार धाराशिव येथे सन २०२१ मध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय स्थापन करणेबाबत मंजुरी देण्यात आली होती तथापि, येथील महाविद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी अद्यापही निधी उपलब्ध करून दिलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या इमारतीच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. हसन मुश्रीफ (१९-०९-२०२५) : (१) हे खरे आहे.
(२) व (३) प्रस्तावित प्रकल्पाकरीता शासन स्तरावरुन दिनांक ०७.०४.२०२५ रोजी रु.४०३.८९ कोटी इतक्या रक्कमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे
तसेच प्रस्तावित प्रकल्पाकरीता सन-२०२५-२६ करीता प्रत्यक्ष बांधकामासाठी कंत्राटदार यांचे नेमणूक आदेश निर्गमित केल्यानंतर आवश्यकते नुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

बीड जिल्हयामध्ये शासनाच्या विविध लेखाशिर्षातंर्गत करण्यात येणाऱ्या विकास कामांच्या निविदा प्रक्रियेबाबत

(२१) ५४४३ (२४-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड **जिल्हयामध्ये** शासनाच्या विविध **लेखाशिर्षातंर्गत** विकास कामे करण्यात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर विकास कामे येत असतांना प्रशासकीय मान्यतेच्या आधारे आपल्या ग्रामपंचायतीच्या अधिनस्त असलेल्या निविदा विभाग, निविदा प्रसारित करून अथवा काम वाटप समितीला देवून पुढील कार्यवाही करण्यात येते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, काही ठराविक कंत्राटदाराकडून ग्रामपंचायतीची अथवा नगरपालिकेची कोणत्याही स्वरूपाची ना-हरकत प्रमाणपत्र न घेता सर्रास बोगस ना-हरकत प्रमाणपत्र जोडण्यात येवून निविदा विभागाकडून कंत्राट मिळवीत असल्याच्या तक्रारी देखील स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर ग्रामपंचायतीवर विनाकारण अन्याय होत असून पूर्वी झालेले कार्यारंभ आदेश व येथून पुढे होणार असलेल्या कार्यारंभ आदेशामध्ये विभागाने सर्व कागदपत्रांची खातरजमा करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शासनाने चौकशी करून संबंधित दोषी अधिकारी यांच्याविरूद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) : (१) व (२) शासनाच्या विविध लेखाशिर्षा अंतर्गत मंजुर विकास कामे ग्रामपंचायतींना करण्यासाठी ग्राम विकास विभागाच्या दिनांक २५ मार्च, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, ग्रामपंचायतींच्या विकास कामांबाबत मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार तालुक्यातील वेगवेगळया ग्रामपंचायतींच्या विविध विकास कामाचे प्रशासकिय आदेश प्राप्त / निर्गमित झाल्यानंतर सदरील ग्रामपंचायत आर्थिक दृष्ट्या सक्षम असल्यास सदरची ग्रामपंचायत काम करते. परंतु सदरची विकास कामे पुर्ण करण्यास आर्थिक दृष्टया ग्रामपंचयात सक्षम नसल्यास तसे प्रमाणपत्र तालुका अंतर्गत उप विभागाकडे प्रस्ताव सादर करतात व सदरचा प्रस्ताव उप विभागाकडुन प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाअंतर्गत प्रशासकिय मंजुरी असलेली कामे काम वाटप करण्यासाठी समितीच्या बैठकीत ठेवुन काम वाटप समितीने शिफारस केल्यानुसार संबधित सुशिक्षीत बेरोजगार अभियंता / मजुर सहकारी संस्था मर्या, वैयक्तीक कंत्राटदार यांची शिफारस करण्यात येते.

(३), (४), (५) व (६) प्रश्न उद्‌भवत नाही

बीड तालुक्यातील ग्रामपंचायत स्तरावरील खरेदीमध्ये झालेली अनियमितता

(२२) ५९१० (२४-०४-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड पंचायत समिती अंतर्गत सन २०२० ते २०२५ या कालावधीमध्ये १).जी.एस.इंजिनिअरींग, २. वैभव पवार, ३. अमोल जगदाळे, ४. श्रेयश सोलार, ५. अक्षय घरत व इतर विद्युत कंत्राटदारांनी ग्रामपंचायत स्तरावर सर्व लेखाशीर्ष अंतर्गत विद्युत विभागाची कामे केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर कंत्राटदारांनी इतरही लेखाशीर्ष अंतर्गत कामे वर्ग केल्याच्या तक्रारी ग्रामस्थ व ग्रामपंचायतीकडून स्थानिक लोकप्रतिनिधी यांचेकडे प्राप्त आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, अनुदानावरील खरेदीमध्ये कंत्राटदाराने निकृष्ट दर्जाच्या वस्तू दिल्याच्या व त्या वस्तूंमध्ये कोणत्याही स्वरुपाचे मुल्यांकन नसल्याचे व निकृष्ट दर्जाच्या दुरुस्तीच्या कामांवर झालेला निधीचा अपव्यय रोखणेबाबतच्या अनेक तक्रारी मा.स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडून शासनास पत्राद्वारे केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार निधीचा अपव्यय केल्याप्रकरणी संबंधित अधिकारी व कंत्राटदारांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (०६-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.

मा.लोकप्रतिनिधी यांचे पत्र जा.क्र.SRK /०८०३/२०२४ दि.३०/०८/२०२४ अन्वये मी या विभागास तक्रार प्राप्त झाली होती.सदरील प्राप्त तक्रारींचे अनुषंगाने मा.लोकप्रतिनिधी यांनी त्यांचे पत्र जा.क्र. SRK /०८८५/२०२४ दि. २०/०९/२०२४ अन्वये उपरोक्त दिलेल्या तक्रारींचे निरसन प्रत्यक्ष काम पाहणी करून व या कार्यालयाचे प्रचलित नियमानुसार झाले आहे.
(३) हे खरे नाही,

ग्रामपंचायत अधिकारी यांच्या मार्फत अहवाल मागविल्यानुसार सदरील कामे ही ग्रामपंचायत स्तरावर झालेली असून संबंधित कंत्राटदार एजंसी यांच्याकडून दर्जदार साहित्याचा पुरवठा करण्यात आलेला आहे असा लेखी अहवाल संबंधित ग्रामपंचायतीने सादर केलेला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही
(५) प्रश्न उद्‌भवत नाही .

करवीर (जि. कोल्हापूर) तालुक्यातील कोल्हापूर पध्दतीचे बंधारे व साठवण तलावाचे प्रस्ताव सादर करणेबाबत

(२३) ५९५१ (०५-०५-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) करवीर (जि. कोल्हापूर) तालुक्यातील कोल्हापूर पध्दतीचे बंधारे, द्वारयुक्त बंधारे तसेच साठवण तलावाचे प्रस्ताव सादर करण्याचे तसेच आदेश होण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. जलसंपदा मंत्री यांना नुकतेच दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावाबाबत व निवेदनावर अद्याप काहीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. संजय राठोड (१५-०७-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी एकूण १६ गावामध्ये को.प.बंधारा, व्दारयुक्त बंधारा व साठवण तलाव होण्यासाठी मागणी केली होती. जलसंधारण अधिकारी यांनी संबंधित ग्रामपंचायत प्रतिनिधी सोबत क्षेत्रिय पाहणी केली असता एकूण १६ बंधा-यांपैकी १५ गावांमध्ये तांत्रिक मापदंडानुसार मागणी प्रकल्प सफल होत नसल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे. त्यामुळे सर्वेक्षण करण्यात आले नाही. उर्वरित कणेरी गावामध्ये योजना विभागाच्या तांत्रिक व आर्थिक मापदंडात सफल होत असल्यामुळे त्यांचे सर्वेक्षण व अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही .

कोल्हापूर जिल्हयात आयटी पार्क उभारणेबाबत

(२४) ५९५७ (२४-०४-२०२५). श्री.अमल महाडिक (कोल्हापूर दक्षिण) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यात संगणक, माहिती तंत्रज्ञान उद्योगांची वाढ व्हावी, स्थानिक युवकांना रोजगार मिळावा यासाठी शेंडापार्क परिसरात उभारण्यात येणाऱ्या आयटी पार्क अद्यापही उभारण्यात आला नसल्याचे माहे डिसेंबर, २०२४ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेंडा पार्क येथील आयटी पार्कसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाची ३० हेक्टर जागा उपलब्ध करून द्यावी व या जागेच्या बदल्यात कृषी विद्यापीठास त्यांच्या विविध प्रकल्पांसाठी शहरालगतची ५० हेक्टर जागा द्यावी असे निर्देशही तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री यांनी दिले असूनही अनेक वर्षे उलटून गेले तरी ही जागा अद्यापही आयटी पार्कला मिळालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आयटी पार्क स्थापन करणेबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा. मुख्यमंत्री यांना नुकतेच दिले असून यावर अद्याप काहीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार कोल्हापूर जिल्हयात आयटी पार्क उभारण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा कराण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (२७-०६-२०२५) : (१) अशंत: खरे आहे.

(२),(३) व (४) प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे अध्यक्षतेखाली दि.०४.१०.२०२३ रोजी बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने म.औ.वि. महामंडळाकडून जिल्हाधिकारी, कोल्हापूर तसेच संचालक, विभागीय कृषी केंद्र, कोल्हापूर यांना शेंडा पार्क येथील आयटी पार्कसाठी महात्मा फुले कृषी विद्यापीठाची जागा उपलब्ध करून देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच म.औ.वि. महामंडळाच्या दि.२२.०१.२०२५ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना शेंडा पार्क येथील गट नंबर ५८७ व ५८८ मधील ३४.७६.१० हे.आर जागा म.औ.वि. महामंडळास हस्तांतरण करण्याची कार्यवाही लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत पुनश्च: विनंती करण्यात आली आहे.

त्यानुषंगाने संचालक, विभागीय कृषी केंद्र, कोल्हापूर यांचेकडून आय.टी.पार्ककरीता आवश्यक असणारी जागा विहित प्रक्रिया पार पाडून म.औ.वि.महामंडळास हस्तांतरीत करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही .

आसोला ते देवठाणा (ता. मांनोरा, जि.वाशिम) या रस्त्यांचे **काम पूर्ण करणेबाबत**

(२५) ६०४४ (२४-०४-२०२५). श्रीमती सई डहाके (कारंजा) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आसोला ते देवठाणा (ता. मांनोरा, जि.वाशिम) या ४ कि.मी. लांबी असलेल्या रस्त्यांचे काम पंतप्रधान ग्रामसडक योजनेअंतर्गत सन २०२३-२४ मध्ये सुरू झाले होते हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्यांचे काम बंद पडल्याने या मार्गावरील वाहतूकदारांस आणि शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होत आल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने सदर रस्त्यांचे काम तातडीने सुरू करून पूर्ण करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (२८-०५-२०२५) : (१),(२) व (३) प्रश्नांकीत रस्ता हा पांदण रस्ता या प्रवर्गातून दर्जोन्नत होऊन मुख्यमंत्री ग्रामसडक योजना टप्पा-१ मध्ये WAS-६३ या पॅकेज अंतर्गत ३.९० कि.मी. लांबी करिता प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. प्रस्तुत रस्त्याच्या सा.क्र.०/८०० ते ३/९०० लांबीमध्ये मातीकाम व मुरूम अस्थरीकरण १०० मी जाडीचा एक थर पुर्ण झाला आहे. तसेच १७ मो-या/पुलांचा समावेश असून त्यापैकी ११ मो-या पुर्ण झाली आहेत.त्यावर रू.३८.६६ लक्ष इतका खर्च झाला असून रू.३०.०० लक्ष इतका खर्च प्रलंबित आहे.साखळी क्र.०/०० ते ०/८०० लांबीमध्ये जमीन उपलब्ध करून देण्यास स्थानिक शेतक-यांच्या विरोध आहे. त्याबाबत वारंवार पत्रव्यवहार करून योग्य तो प्रतिसाद मिळत नसल्याने काम प्रलंबित आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही .

रत्नागिरी तसेच दापोली औद्योगिक पट्टंयामध्ये भूखंड वाटपात झालेली गैरव्यवहार

(२६) ६०६० (२४-०४-२०२५). श्री.सुरेश धस (आष्टी) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औद्योगिक धोरणाला बगल देत रत्नागिरी जिल्ह्यातील विविध समाजाच्या संघटनांसाठी रत्नागिरी व दापोली औद्योगिक पट्ट्यातील ३०० ते १००० चौरस मीटर भूखंडाचे वाटप माहे जुलै ते माहे सप्टेंबर, २०२४ मध्ये नाममात्र दराने सुमारे १२ सामाजिक संस्थांना केले असल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विविध समाज संस्थांना सामाजिक कार्यासाठी भूखंड देणे औद्योगिक विकासाच्या कार्यकक्षेत येत नाही असे स्पष्ट मत एमआयडीसी प्रशासनाने व्यक्त केले असतानाही प्रशासनावर उच्च पदस्थानकडून आलेल्या दबावामुळे एमआयडीसी संचालक मंडळाने या ठरावाला मंजुरी देताना हा अपवादात्मक निर्णय असल्याचे नमूद केले, हे ही खरे आहे काय,

(३)असल्यास, दोन वेगवेगळ्या ठरावांद्वारे या बारा भूखंडाचे वाटप करण्यात आले असून त्यामध्ये कुणबी

समाजोन्नती संघ दापोली, कुणबी समाज उन्नती संघ रत्नागिरी जिल्हा, तेली समाज सेवा संघ, रोहिदास समाज, जमातूल मुस्लिमीन बाजारपेठ, क्षत्रिय मराठा मंडळ, पांचाळ सुतार समाज मंडळ इत्यादींना हे वाटप करण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, हे बारा भूखंड किती चौरस मीटरचे व नाममात्र किती दराने देण्यात आले आहेत,

(५) असल्यास, या संस्थांनी भूखंडाचे सर्व पैसे वेळेत एमआयडीसी ला दिले आहेत काय, नसल्यास त्यांना भूखंडाचा ताबा दिला आहे काय, पैसे न देता भूखंडाचा ताबा देण्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत,

(६) तसेच, भूखंडाचा ताबा देताना करण्यात आलेल्या करारामध्ये कोणत्या अटींचा उल्लेख करण्यात आला आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (२७-०६-२०२५) :(१) व (२) रत्नागिरी (मिरजोळे) औद्योगिक क्षेत्रासाठी विविध समाजामधील व्यक्तींच्या जमीनी संपादन झाल्या असल्याने अशा समाजातील व्यक्तींना एकत्र बसून युवकांचे प्रश्न, महिलांच्या समस्या सोडविणे, सर्व समाज बांधव एकत्र येऊन त्या समाजाच्या व्यक्तींचा एकत्रित व्यवसायाच्या दृष्टीने एकत्रित चर्चा, व्यवस्थापन, कार्यालय, युवकांना तांत्रिक प्रशिक्षण देणे इत्यादी कामासाठी अशा सामाजिक संस्थांना समाज भवन उभारणकरीता सुमारे ३०० ते ५०० चौ.मी. पर्यंतचे भूखंड ठेवण्याचे आणि सदर जागा सवलतीच्या दराने वाटप करण्याची मागणी होती. महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्राकरीता विविध समाजप्रवर्गातील व्यक्तींचा जमिनी संपादन करण्यात आलेल्या आहेत. अशा समाजासाठी सामाजिक बांधीलकी या नात्यातून म.औ.वि. महामंडळाच्या संचालक मंडळाच्या मंजूरीने भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) प्रत्येक समाजाकरीता ३०० चौ. मी. व त्याचा दर रु.१/- प्रती चौ.मी. असा होता.

(५) भूखंडाची रक्कम भरणा झालेली आहे. तसेच भूखंडाचा ताबा दि. २४/०१/२०२५ रोजी देण्यात आलेली आहे.

(६) अद्याप पर्यंत करारनामा झालेला नाही. म.औ.वि.महामंडळाचे नियमानुसार करारनामा करणेची कार्यवाही प्रादेशिक कार्यालयांतर्गत करण्यात येईल.

रावेर (जि.जळगांव) येथील एम.आय.डी.सी. विस्ताराबाबत

(२७) ६३६० (१७-०४-२०२५). श्री.अमोल जावळे (रावेर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रावेर (जि.जळगांव) येथील स्थानिक युवकांना रोजगार मिळावा यासाठी रावेर विधानसभा क्षेत्र अंतर्गत येणाऱ्याउ एमआयडीसीच्या विस्तारासंबंधी शासनाची योजना काय आहे,

(२) असल्यास,या विस्तारासाठी कोणती जागा निवडण्यात आली आहे आणि त्याचा आराखडा कधी पर्यत पूर्ण होईल,

(३) असल्यास, या विस्तारामुळे स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होणार आहेत काय व यामध्ये कोणत्या उद्योगधंद्यांचा समावेश करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, रावेर व यावल तालुका तसेच आजूबाजूचे क्षेत्र हे आदिवासी बहु क्षेत्र असल्या कारणाने युवकांना स्थानिक स्तरावर रोजगार मिळण्यासाठी तसेच उद्योग धंद्यांच्या विस्तारासाठी एमआयडीसी ला "ड" दर्जा मिळू शकणार आहे काय,

(५) नसल्यास, भविष्यात याबाबत काही योजना आहे काय ?

श्री. उदय सामंत (२७-०६-२०२५) :(१) व (२) मौजे पाल, ता. रावेर, जि. जळगाव येथील गट नं.२८८ पैकी ११७.७५ हे.आर इतकी जमीन औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यासाठी निवडण्यात आली होती. तथापि, सदर जमीन ही वन विभागातंर्गत येत असल्यामुळे केंद्र शासनाची परवानगी प्राप्त झाल्यानंतर सदर वन जमीन वनेत्तर प्रयोजनासाठी हस्तांतर प्रक्रिया व खाजगी जमिनीच्या भूसंपादनाची कार्यवाही पूर्ण करुन औद्योगिक विस्तारासाठी आराखडा तयार करता येणे शक्य आहे.
(३) व (४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत सदर ठिकाणी औद्योगिक क्षेत्र स्थापन होऊन विकसित झाल्यास विविध उद्योगांची स्थापना होऊन स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निश्चितच उपलब्ध होतील. सद्यस्थितीत औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.
सामुहिक प्रोत्साहन योजना २०१९ (PSI) नुसार सद्यस्थितीत जळगांव ‍जिल्हा D+ श्रेणीत येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही .

जिल्हा परिषद, पालघर विभागातील रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याच्या प्रक्रियेमध्ये झालेली अनियमितता

(२८) ६४४३ (०५-०५-२०२५). श्री.विनोद निकोले (डहाणू) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :
(१) जिल्हा परिषद पालघर अंतर्गत विविध विभागातील रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने बाह्य यंत्रणेद्वारे भरण्याची वित्त विभागाने केलेल्या प्रक्रियेमध्ये शासनाने घालून दिलेल्या नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, स्थायी समितीच्या दिनांक ०३ डिसेंबर,२०२४ रोजी झालेल्या बैठकीमध्ये वित्त विभागाने नियमबाह्य पद्धतीने केलेली भरती प्रक्रिया रद्द करण्याचा ठराव एकमताने झाला असून दिनांक १३/१२/२०२४ रोजीच्या जिल्हा परिषद सर्व साधारण सभेमध्ये सर्व जिल्हा परिषद सदस्यांनी नियमबाह्य झालेल्या भरती प्रक्रियेची चौकशी करण्यासाठी चौकशी समिती नियुक्त करून चौकशी करण्याची मागणी केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशी समितीच्या अहवालामध्ये निविदा प्रक्रिया राबविताना स्पर्धात्मक निविदा न केल्यामुळे शासनाचे आर्थिक नुकसान झाले असल्याची बाब समोर आली असून रु.एक कोटी पेक्षा जास्त रकमेच्या निविदांसाठी राज्यस्तरीय किंवा विभागीय वर्तमान पत्रामध्ये नोटीस प्रसिद्ध करणे आवश्यक असताना याबाबीचा विचार झाला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर निविदा प्रक्रिया व खरेदी प्रक्रिया खाते प्रमुखांच्या नियंत्रणात असावी असा शासन निर्णय असताना मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सदर प्रक्रिया हाताळून निविदा प्रक्रियेमध्ये अनियमितता केल्याचे निदर्शनास आले असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्थापन केलेल्या चौकशी समितीने दिलेल्या चौकशी अहवालामध्ये संबधित अधिकारी यांनी संगनमताने अनियमितता केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, जिल्हा परिषद पालघर अंतर्गत विविध विभागातील रिक्त पदे कंत्राटी पद्धतीने बाह्य यंत्रणेद्वारे भरण्याची वित्त विभागाने केलेली प्रक्रिया नियमबाह्य असल्याने सदर प्रक्रिया रद्द करून संबंधीत दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (३०-९-२०२५) : (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, सदर ठरावाच्या अनुषंगाने प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण यंत्रणा, पालघर यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती नेमण्यात आली होती.

(३) एक कोटी रुपयापेक्षा जास्त रक्कमेच्या निविदेसाठी राज्यस्तरीय किंवा विभागीय वर्तमान पत्रामध्ये नोटीस प्रसिद्ध करण्यात आलेली नाही ही बाब खरी आहे. जिल्हा परिषदेच्या खरेदी समितीच्या मान्यतेने, उद्योग उर्जा व कामगार विभागाकडील शासन निर्णय दि.१.१२.२०१६ नुसार अभिव्यक्ती स्वारस्यद्वारे एकलिफाफा (तांत्रिक) पद्धतीने ई-निविदा करण्यात आली होती. अधिक प्रतिसाद व स्पर्धा व्हावी याकरीता www.mahaetender.gov.in वर ऑनलाईन ई-निविदा प्रसिद्ध करण्यात येऊन ती सर्वांसाठी खुली होती.

(४) हे अंशत: खरे आहे. संबंधित खाते प्रमुखांच्या दि.२७.०८.२०२४ व दि.१३.०९.२०२४ रोजीच्या बैठकीमध्ये चर्चेप्रमाणे निर्णय घेतलेला आहे.

(५) सदर प्रकरणी चौकशी अहवाल प्राप्त झाला असून संबंधित विभागप्रमुख यांची बैठक आयोजित करुन ज्या विभागांना कंत्राटी पदभरती करावयाची आहे त्यांना स्वतंत्रपणे पदभरतीबाबत निविदा करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत व ज्या विभागामध्ये यापुर्वी कंत्राटी पद्धतीने कर्मचाऱ्यांची नियुक्ती झालेली आहे अशा कर्मचाऱ्यांची सेवा दि.३१.०३.२०२५ पर्यंत सुरू ठेवून तद्नंतर विभागांनी स्वतंत्रपणे कर्मचारी भरती प्रक्रिया राबविण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने नियमानुसार करावयाची कार्यवाही सुरू आहे.

जालना जिल्ह्यातील मृद व जलसंधारण विभागात झालेला आर्थिक गैरव्यवहार

(२९) ६५२५ (२४-०४-२०२५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) : सन्माननीय **मृद व जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यातील मृद व जलसंधारण विभागातील अधिकारी श्री. आर. एच. झुरावत, परतुर तसेच घनसावंगी येथील उप विभागीय अधिकारी श्री. व्हि.एन.निरवळ व जलसंधारण अधिकारी श्री.व्ही.डी. ढोबळे यांनी कंत्राटदार, मंजूर सस्था यांचेशी संगनमत करुन कोल्हापूरी बंधारे व सिमेंट बंधाऱ्याचे सर्व्हेक्षण व अन्वेषण करण्याच्या नावाखाली सन २०२२-२३ मध्ये परतूर, घनसावंगी व मंठा तालुक्यामध्ये जवळपास रु. २ कोटी ४० लक्ष रुपयांची देयके काढून गैरव्यवहार केल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी तक्रार केली आहे, ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशीअंती काय आढळून आले त्यानुषंगाने सदर जलसंधारण अधिकारी श्री.आर.एच.झुरावत यांनी अवैधरित्या कामे करुन शासनाच्या पैशाच्या केलेल्या अपहाराची संबंधित अधिकाऱ्यांकडून वसूलीची कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही शासनाकडून केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. संजय राठोड (२३-०९-२०२५) :(१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही .

(४) प्रश्न उद्भवत नाही

गोंदिया जिल्ह्यात महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळातर्फे कामगारांना सोयी-सुविधा मिळणेबाबत

(३०) ६५३५ (०५-०५-२०२५). श्री.संजय पुराम (आमगाव) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया जिल्ह्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना तसेच इतर विविध योजनेतील कामाचे ९० दिवस पूर्ण झालेले कामगार शासकीय योजनांच्या लाभापासून वंचित असल्याचे निवेदन बरेचदा शासनाकडे पाठविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

२) असल्यास, या कामगारांच्या प्रमाणपत्रावर ग्रामपंचायतीतील ग्रामसेवक स्वाक्षरी करीत नसल्यामुळे कामगार आणि त्यांचे कुटुंब शासकीय योजनांपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या कामगारांना महाराष्ट्र ईमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळांतर्फे शासकीय योजनांचा लाभ मिळण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर (०३-१०-२०२५) :

(१) हे खरे आहे.

(२) व (३) हे अंशत: खरे आहे.

गोंदिया जिल्ह्यातील काही ग्रामसेवक कामगारांच्या ९० दिवस काम केल्याबाबतच्या प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करीत नसल्याबाबतच्या तक्रारी सहाय्यक कामगार आयुक्त, गोंदिया यांचे कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत.

या अनुषंगाने सहाय्यक कामगार आयुक्त, गोंदिया यांनी जिल्हयातील सर्व गट विकास अधिकाऱ्यांना बांधकाम कामगारांच्या नोंदणीसाठी आवश्यक असलेले ९० दिवसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत दि.०६.१०.२०२३ व दि.१४.०३.२०२४ व दि.०२.०१.२०२५ रोजीच्या पत्राद्वारे कळविले आहे. तसेच शासनाच्या दि.१३.०८.२०२४ रोजीच्या अधिसुचनेनुसार अपर कामगार आयुक्त, नागपूर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना दि.१८.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांवर झालेल्या खर्चाबाबत

(३१) ६९३५ (०५-०५-२०२५). श्री.प्रशांत बंब (गंगापूर) : सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळानी सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात सर्व योजनांवर मिळून केलेल्या खर्चाची (योजनानिहाय) माहिती मागविणारा अर्ज मंडळाकडे माहे जानेवारी, २०२५ मध्ये वा त्या दरम्यान प्राप्त झाला आहे हे खरे आहे काय,

(२) तसेच, सन २०२२-२३ पासून पुढील कालावधीचा वार्षिक लेखा मंडळाकडे उपलब्ध नसल्याची माहिती मंडळांनी अर्जदारास दिली आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त मंडळाकडे खर्चाचा हिशोब नसण्याची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने सदर मंडळाच्या अधिकाऱ्यांनी खोटी माहिती दिली असेल तर त्यांचे विरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

ॲड. आकाश फुंडकर (०३-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) इमारत व इतर बांधकाम कामगार (रोजगार नियमन व सेवाशर्ती) अधिनियम, १९९६ मधील कलम २७ (१) नुसार,

मा.महालेखापाल यांच्या सल्ल्याने विहीत केलेल्या नमुन्यात मंडळामार्फत त्यांच्या जमा खर्चाच्या लेख्यांचे वार्षिक विवरणपत्र तयार करण्यात येते. त्यानुसार मंडळाने सन २०२२-२३ व २०२३-२४ या आर्थिक वर्षांच्या जमा खर्चाचे वार्षिक विवरण लेखे मंडळाकडील नियुक्त सनदी लेखापाल यांचेकडून तयार करून घेतले आहेत. त्यास मंडळाच्या ठरावान्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

सदर अधिनियमाच्या कलम २७ (३) नुसार मंडळाच्या जमा खर्च लेख्यांच्या वार्षिक विवरणपत्राचे लेखापरिक्षण मा.महालेखापाल कार्यालयाकडे तपासणीसाठी सादर करण्यात आले आहेत. मा.महालेखापाल कार्यालयाकडून सदर लेख्यांचे लेखापरिक्षण पुर्ण झाल्यानंतर सदर अहवाल उक्त अधिनियमातील कलम २७ (५) नुसार विधानमंडळासमोर सादर करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही .

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

बीड जिल्हापरिषदेतील उप अभियंता यांनी पाणीपुरवठा विभागात केलेला गैरव्यवहार

(३२) ७०४४ (०५-०५-२०२५). श्री.संदिप क्षीरसागर (बीड) : सन्माननीय **पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद बीड मधील कार्यकारी अभियंता हे पद प्रभारी अधिकार्यांकडे दिले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रभारी उप अभियंता अधिकारी हे इतर उप अभियंता यांचे पेक्षा सेवेमध्ये कनिष्ठ असल्याचे निदर्शनास आलेले आहे हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपअभियंता श्री.आंधळे यांच्या पत्नीच्या नावे ग्रामीण पाणीपुरवठा विभागाची कामे असताना व सेवेत सर्वात कनिष्ठ उप अभियंता असताना श्री.आंधळे यांच्याकडे पदभार कोणत्या नियमाधीन देण्यात आला आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशी अंती काय आढळून आले त्यानुषंगाने संबंधीत अभियंता यांचेवर कारवाई करणेबाबत शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. गुलाबराव पाटील (११-०७-२०२५) : (१) होय, हे खरे आहे. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड हे पद रिक्त असून त्या पदाचा अतिरिक्त कार्यभार उप अभियंता दर्जाच्या अधिकाऱ्याकडे सोपविला आहे.

(२) व (३) प्रभारी कार्यकारी अभियंता श्री. मुकुंद आंधळे हे तत्कालीन स्थितीत उप अभियंता श्री. एस. बी. धाबेकर, श्री. एम. जी. पठाण, श्री. शेख एम. ए., श्री. जी. बी. राठोड यांच्यापेक्षा सेवा कनिष्ठ आहेत.

तत्कालीन स्थितीत श्री. एस. बी. धाबेकर यांचा मूळ कार्यभार ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, गेवराई असून त्यांना माजलगाव व धारूर उपविभागाचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला होता. तसेच श्री. एम. जी. पठाण, श्री. शेख एम. ए., श्री. जी. बी. राठोड यांच्याकडे अनुक्रमे परळी, बीड, पाटोदा ग्रामीण पाणी पुरवठा

उपविभागाचा पदभार होता.

दिनांक २४.०१.२०२४ रोजीच्या शासन आदेशान्वये श्री. मुकुंद आंधळे, उप अभियंता यांची पदोन्नतीने पदस्थापना ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, बीड याठिकाणी करण्यात आली आहे. शासन निर्णय दिनांक ०५.०९.२०१८ नुसार त्याच कार्यालयातील जेष्ठ अधिकाऱ्यास पदभार देण्याच्या सूचना विचारात घेऊन जिल्हा परिषद स्तरावर श्री. मुकुंद आंधळे उप अभियंता यांच्याकडे कार्यकारी अभियंता पदाचा अतिरिक्त कार्यभार दिनांक ३१.०३.२०२४ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आला आहे.

श्री. मुकुंद आंधळे, उप अभियंता यांच्या पत्नीच्या नावे माहे ऑक्टोबर २०२२ मधील ई-निविदा प्रक्रियेअंती २ कामांचे कार्यारंभ आदेश दिनांक १८.०१.२०२३ रोजी निर्गमित करण्यात आले आहेत. श्री. आंधळे यांना अतिरिक्त कार्यभार देत असताना सदरील कामे ८५% व ९५ % पूर्ण झाली होती व सदरील कामांचे अधिकार कार्यकारी अभियंता (बांधकाम क्रमांक २) जिल्हा परिषद, बीड यांना देण्यात आले आहेत.

(४) श्री. मुकुंद आंधळे, प्रभारी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, बीड यांच्या पत्नीच्या नावे पाणी पुरवठा योजनांची कामे असणे, सदरील बाब वर्तणूक नियमानुसार असणे, इ. मुद्द्याबाबत समुचित तपासणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांना देण्यात आल्या आहेत. विभागीय आयुक्त, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडून चौकशी अहवाल प्राप्त होताच पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही .

राज्यात मिशन शक्ती सामर्थ्य या कार्यक्रमातंर्गत अंगणवाडयांमध्ये पाळणाघर सुरू करणेबाबत

(३३) ७४९४ (०८-०९-२०२५). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मिशन शक्ती सामर्थ्य या कार्यक्रमातंर्गत सर्व अंगणवाडयांमध्ये पाळणाघर सुरू करण्यास शासनाने मान्यता दिली असून सदर योजना कधी पासून अंमलात येणार आहे ,

(२) असल्यास, सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी एकूण किती नविन पदे निर्मिती होणार आहेत व आतापर्यंत किती पदे भरली गेली आहेत,

(३) असल्यास, केंद्र शासनाच्या निर्देशानुसार सदर योजना सुरू केली असून याकरीता केंद्र व राज्य शासनाचा किती निधी खर्च होणार आहे व सदर खर्चाचे स्वरूप व नियोजन कसे करण्यात आले आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (३०-०९-२०२५) : (१) व (२) राज्यात मिशन शक्ती सामर्थ्य या कार्यक्रमाअंतर्गत एकूण ३४५ पाळणाघर (Anganwadi cum creche) सुरु करण्यास केंद्र शासनाने मान्यता दिली आहे. सदर योजना कार्यान्वित करण्यासाठी प्रति पाळणाघर एक पाळणघर सेविका व एक पाळणाघर मदतनीस अशी प्रति पाळणाघर २ पदे याप्रमाणे पदांची नव्याने निर्मिती होणार आहे. त्यानुषंगाने योजनेची अमंलबजावणी करण्यात येत आहे.

(३) सदर योजनेंतर्गत प्रति पाळणाघराकरिता साधारणत: वार्षिक खर्च रु.३,३५,६००/- एवढा असून त्यापैकी केंद्र हिस्सा ६०% व राज्य हिस्सा ४०% असा आहे. त्यानुसार ३४५ पाळणाघरांकरिता एकूण रु. १३.३०३२ कोटी

एवढा अंदाजित खर्च अपेक्षित असून त्याबाबत नियोजन करण्यात आलेले आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

राज्यातील अंगणवाडीमध्ये शालेय पोषण आहारामध्ये निकृष्ट धान्य पुरविणाऱ्या ठेकेदारांवर गुन्हे दाखल करणेबाबत

(३४) ७९०० (०८-०९-२०२५). श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या विविध निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी करण्यासाठी अंगणवाडी सेविका प्रामाणिकपणे काम करीत असून त्यांच्यावर अन्याय होणार नाही याची जबाबदारी घेऊन त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी अधिकाऱ्यांनी बैठक घ्यावी असे निर्देश मा.पालकमंत्री यांनी माहे एप्रिल, २०२५ च्या दुसऱ्या आठवड्यात वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी येथे घेतलेल्या बैठकित दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
२) असल्यास, याचसंदर्भातील सूचना मा. पालकमंत्री यांनी दिनांक ८ एप्रिल २०२५ रोजी शहापूर येथील पंचायत समिती सभागृहात संबंधित अधिकाऱ्यांसोबत बैठकी दरम्यान दिल्या आहेत ,हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, अंगणवाडीमध्ये ठेकेदारांनी जर निकृष्ट धान्य पुरविले असेल तर संपूर्ण रोष अंगणवाडी सेविकांवर येत असल्याने शालेय पोषण आहारामध्ये निकृष्ट धान्य पुरविणाऱ्या ठेकेदारांवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत असे निर्देशही पालकमंत्री यांनी दिले आहेत , हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्याअनुषंगाने सदर निर्देशाची अंमलबजावणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, त्याबाबतची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (३०-०९-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.

दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजी, मा.पालकमंत्री, रत्नागिरी यांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत संघटना प्रतिनिधी आणि अधिकारी यांच्यासोबत विविध विषयासंदर्भात बैठक आयोजित केली होती. या बैठकीत पोषण आहारासंदर्भात चर्चा करताना अंगणवाडीतील लाभार्थ्यांना शासनाकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या पोषण आहाराबाबत (THR) पालकांच्या तक्रारी येत असल्याने अंगणवाडी सेविकांना पालकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. ही बाब गंभीर असून, यापुढे जर निकृष्ट दर्जाचा आहार पुरवठा झाल्यास संबंधित ठेकेदारांवर गुन्हा दाखल करावा असे निर्देश पालकमंत्री यांनी दिले आहेत.
(२) हे खरे नाही.
(३) अंशत: खरे आहे.

दिनांक ७ एप्रिल २०२५ रोजी, मा.पालकमंत्री, रत्नागिरी यांनी अंगणवाडी कर्मचाऱ्यांच्या समस्यांबाबत

संघटना प्रतिनिधी आणि अधिकारी यांच्यासोबत विविध विषयासंदर्भात बैठक आयोजित केली होती. या बैठकीत पोषण आहारासंदर्भात चर्चा करताना अंगणवाडीतील लाभार्थ्यांना शासनाकडून पुरवठा करण्यात येणाऱ्या पोषण आहाराबाबत (THR) पालकांच्या तक्रारी येत असल्याने अंगणवाडी सेविकांना पालकांच्या रोषाला सामोरे जावे लागते. ही बाब गंभीर असून, यापुढे जर निकृष्ट दर्जाचा आहार पुरवठा झाल्यास संबंधित ठेकेदारांवर गुन्हा दाखल करावा असे निर्देश पालकमंत्री यांनी   दिले आहेत.

(४) संबंधित जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी त्यांच्या अधिनस्त बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचेकडून पोषण आहार पुरवठ्याचा आढावा घेतला आहे. जिल्ह्यामध्ये सर्व ठिकाणी पोषण आहार पुरवठा चांगल्या प्रतीचा होत असल्याची त्यांनी खात्री केली आहे. तसेच, सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना त्यांच्या अधिनस्त अंगणवाडी सेविका व अंगणवाडी पर्यवेक्षिका यांना पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत:-

• अंगणवाडी स्तरावर शासनाकडून पुरवठा करण्यात येणारा पोषण आहार (THR) चांगला व उत्कृष्ट दर्जाचा असल्याची खात्री करूनच तो स्वीकारला जावा.

• जेव्हा THR प्राप्त होईल, तेव्हा त्याची खात्री करावी आणि तो निकृष्ट दर्जाचा असल्यास अंगणवाडी स्तरावर स्वीकारला जाऊ नये.

त्याचप्रमाणे एकात्मिक बाल विकास सेवा योजना आयुक्तालय यांचे स्तरावरून घरपोच आहाराच्या सर्व पुरवठादारांना आहार तयार करताना योग्य ती काळजी घेण्याबाबत आणि चांगल्या प्रतीचा आहार विहित कालावधीत अंगणवाडी स्तरावर पोहोचवण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही

गडचिरोली जिल्ह्यातील अंगणवाडी सेविका पद भरतीमध्ये स्थानिक महिलांना प्राधान्य देण्याबाबत

(३५) ८११८ (०८-०९-२०२५). श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्ह्यात आदिवासी व मागास भागांतील टोळ्यांमध्ये (वनवस्ती, पडकी वस्ती) राहत असलेल्या स्थानिक महिलांना अंगणवाडी सेविका भरतीमध्ये महसुली गावातील महिलांपेक्षा प्राधान्य देण्याबाबत शासन विचाराधीन आहे काय,

(२) असल्यास, या भरती प्रक्रियेसंदर्भातील शासनाची भूमिका काय आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (३०-०९-२०२५) : (१) व (२) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक २.०२.२०२३ अन्वये ग्रामीण व आदिवासी प्रकल्पातील अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस या पदावर नियुक्तीकरिता महसुली गाव/वाडी/वस्ती/पाडे यासह अशी वास्तव्याची अट विहित करण्यात आली आहे. त्यानुसार गडचिरोली जिल्हयातील अंगणवाडी भरती प्रक्रियेमध्ये ज्या महसुली गावातील रिक्त पदे असतील त्याच महसुली गावातील पात्र उमेदवारांना गुणानुक्रमानुसार नियुक्ती दिली जाते.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही .

राज्यातील अंगणवाड्यांच्या समस्या व त्यातील सुविधांचे यांचे ऑडिट करणेबाबत

(३६) ८२०८ (०८-०९-२०२५). श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.बाळासाहेब (यवतमाळ), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बालकांचे आरोग्य, शिक्षण आणि पोषण या त्रिसूत्रीचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अंगणवाड्या हा महत्वाचा दुवा असतानाही राज्यातील २६,००० अंगणवाडयांमध्ये शौचालय उपलब्ध नसणे, ६३,८२७ अंगणवाडी केंद्रांपर्यंत विज पुरवठा नसणे तसेच १९,७८६ अंगणवाडीतील बालकांसाठी शुधद पिण्याच्या पाणयाची सोय नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच , राज्यातील २० टक्के अंगणवाडया हया भाडयाच्या जागेमध्ये भरत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बालकांना शिक्षण, आरोग्य आणि पोषण या त्रिसूत्रीच्या उद्देशाने सुरु झालेल्या अंगणवाडयांमध्ये शौचालय उपलब्ध नसण्यामागची कारणे काय आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय त्यानुसार राज्यातील अंगणवाडयांमध्ये शौचालये, वीज पुरवठा, शुध्द पाणी पुरवठा उपलबध करणे तसेच समस्या व त्यातील सुविधांचा वेळोवेळी लेखापरिक्षण (ऑडीट) करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (३०-०९-२०२५) :(१), (२), (३) एकात्मिक बाल विकास सेवा याजेनंतर्गत राज्यात एकूण ११०६२९ अंगणवाडी केंद्र कार्यरत असून त्याबाबतची स्थिती खालीलप्रमाणे आहे:-

स्व:मालकीच्या इमारतीत कार्यरत	भाड्याच्या इमारतीत	शाळा इमारतीत	इतर ठिकाणी कार्यरत
७२३४५	२२७०८	७९९९	७५७७

राज्यातील कार्यरत ११०६२९ अंगणवाडी केंद्रांपैकी ८२७०१ अंगणवाडी केंद्रांना शौचालयाची सुविधा उपलब्ध होती. अंगणवाडी केंद्रांना शौचालय सुविधा पुरविण्याच्या कार्यक्रमामध्ये केवळ स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्राकरिता शौचालय सुविधेसाठी निधी केंद्र व राज्य हिस्सा ६०:४० या प्रमाणात उपलब्ध करून दिला जातो. त्यानुसार राज्यात शौचालयाची व्यवस्था नसलेल्या स्वमालकीच्या ९६६४ अंगणवाडी केंद्रांकरिता FRP (Fiber reinforcement polymer) तंत्रज्ञानाने तयार केलेले बेबी फ्रेंडली शौचालय सुविधा उपलब्ध करण्यास मंजुरी देण्यात आली असून त्यानुसार शौचालय आस्थापित करण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच, स्वमालकीच्या अंगणवाडी केंद्रांव्यतिरिक्त ज्या अंगणवाडी केंद्रात शौचालय सुविधा उपलब्ध नाही, तेथे सार्वजनिक शौचालयाचा वापर करण्यात येतो.

राज्यातील कार्यरत ११०६२९ अंगणवाडी केंद्रांपैकी राज्यात ४६६६४ अंगणवाडी केंद्रांमध्ये वीज सुविधा उपलब्ध आहे. सदर अंगणवाडी केंद्रांकरिता वीज जोडणी व दरमहाचे विद्युत देयके या बाबींचा खर्च संबंधीत ग्रामपंचायत निधीतून केला जातो. तसेच भाडे तत्वावरील अंगणवाड्यांच्या बाबतीत ज्या इमारतींमध्ये वीज सुविधा उपलब्ध आहे अशाच इमारतींमध्ये अंगणवाडी केंद्र भाडेतत्वावर चालविते जाते.

राज्यातील ९०८०५ अंगणवाडी केंद्रांमध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध होती. तद्नंतर सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्यातील १७२५४ अंगणवाडी केंद्रांना पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध करण्याकरिता प्रति अंगणवाडी केंद्र रुपये १७,०००/- याप्रमाणे निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.

महिला व बाल सशक्तीकरण योजनेसाठी जिल्हा वार्षिक योजना सर्वसाधारण अंतर्गत किमान ३% राखीव निधी कायम स्वरूपी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. त्याअंतर्गत अंगणवाडी केंद्रांना वीज जोडणी, तसेच अपारंपरीक स्रोताद्वारे वीज पुरवठा करण्याचे प्रावधान आहे या निधीतून अंगणवाडी स्तरावर नवीन विद्युत जोडणी तसेच सौर ऊर्जा संचाद्वारे विद्युत सुविधा उपलब्ध करून देण्यात येते. तसेच अंगणवाडी केंद्रांना नलिकेद्वारे पाणीपुरवठा, पाणी साठवणूक व पाणी शुद्धीकरण संयत्र बसविणे याबाबतचे प्रावधान आहे. तसेच जलजीवन मिशन या योजनेंतर्गत अंगणवाडी केंद्रांपर्यंत पिण्याच्या पाण्याच्या नळ जोडणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. तसेच Upgradation of AWCs into saskham Anganwadi या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत केंद्र शासनाने निवड केलेल्या राज्यातील स्वमालकीच्या एकूण १३५९५ अंगणवाडी केंद्रांमध्ये आर.ओ. युनिट पुरवठा करण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

राज्यात नागरी क्षेत्रात १४६९३ तर ग्रामीण क्षेत्रात ८०१५ याप्रमाणे एकूण २२७०८ अंगणवाडी केंद्र भाडयाच्या इमारतीत कार्यान्वित आहेत. केंद्र शासनाने अंगणवाडी केंद्र भाडेबाबत दिलेल्या सूचना विचारात घेऊन शासन निर्णय दिनांक १७/०८/२०२३ अन्वये ग्रामीण क्षेत्राकरिता प्रतिमाह रु.२,०००/-, नागरी क्षेत्रातील नगरपालिका/ नगरपरिषद/ नगरपंचायत/ महानगरपालिका क्षेत्राकरिता प्रतिमाह रु.६,०००/- तसेच महानगर क्षेत्राकरिता (Metropolitan) प्रतिमाह रु.८,०००/- प्रमाणे अंगणवाडी इमारत भाडे निर्धारित करण्यात आले आहे.

(४) जिल्हा तसेच राज्य स्तरावर वेळोवेळी होणाऱ्या आढावा बैठकांमध्ये अंगणवाडी केंद्रांतील विविध समस्या तथा सोयी सुविधांबाबत आढावा घेण्यात येतो. त्यानुषंगाने केंद्र, राज्य व जिल्हा स्तरावरुन अंगणवाडी केंद्रांना पायाभूत सुविधा उपलब्ध करणेसाठी कार्यवाही करण्यात येते.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही .

पंचायत समिती, उमरखेड (जि.यवतमाळ) येथील नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास मान्यता देणेबाबत

(३७) ९१८३ (३०-०७-२०२५). श्री.किसन वानखेडे (उमरखेड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायत समिती, उमरखेड (जि.यवतमाळ) येथील नविन प्रशासकीय इमारत बांधकामास मान्यता देण्याबाबत ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, यवतमाळ यांना दिनांक १० मे,२०२५ रोजी वा त्यासुमारास नियोजित बांधकामाची संक्षिप्त टिप्पणी सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या आदेशानुसार नियोजित बांधकामाची संक्षिप्त टिप्पणी सादर करण्यात आली आहे काय त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

श्री. जयकुमार गोरे (१०-०९-२०२५) : (१) हे, खरे नाही.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

मुंबईतील मानखुर्द येथील दि चिल्ड्रेन्स एड सोसायटीच्या जागेवर झालेले अतिक्रमण

(३८) ९३४९ (०८-०९-२०२५). श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मानखुर्द येथील "दि चिल्ड्रन एड सोसायटी" च्या बाजूला १७ एकर शासकीय जागेत अनेक अनधिकृत बांधकामे होत असून येथील प्रवेशद्वारावरच अनधिकृत बार रेस्टॉरंट व भूमाफियांनी झोपड्यांचे बांधकाम करून झोपड्याची विक्री सुरू केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जागेवर अनधिकृत व बेकायदेशीरपणे बांधकामे निष्कासित करण्याबाबत शासन स्तरावरुन व आयुक्त, महिला व बाल विकास आयुक्तालय यांच्या स्तरावरुन आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, जिल्हाधिकारी मुंबई उपनगर व पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांना कळविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, याबाबत शासनाने माहिती घेऊन संबधित विभागाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (०६-१०-२०२५) :(१) होय, हे खरे आहे,
(२) होय, हे खरे आहे.
(३) दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी,मुंबई या मौजे मानखुर्द व मौजे देवनार येथील गावात १४० एकर, ५ गुंठे व १३ आणे जमीन ५० वर्षांसाठी विना आकार भाडेपट्ट्यावर (लीजवर) प्रदान करण्यात आली होती. सदर लिज दि.२८.०३.१९९० रोजी संपुष्टात आली आहे.

सोसायटीस प्रदान केलेल्या अतिक्रमणाने बाधीत झालेल्या जमिनी शर्तभंगाखाली शासनजमा करण्यात आली असून उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), चेंबूर यांनी सदर जमिनीवरील सर्व अतिक्रमणे निष्कासित करुन सदर जमिनीचे अतिक्रमणापासून संरक्षण करावे असे आदेश दिले आहेत. तथापि सदरील प्रकरणी मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे आदेशानुसार मा.मंत्री, महसूल, महाराष्ट्र यांच्याकडे अपील दाखल केले आहे.

मौजे मानखुर्द, ता.कुर्ला येथील दि चिल्ड्रेन्स एड सोसायटी या शासकीय जागेवर झालेले अतिक्रमण काढण्याबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दि.९.९.२०२४ रोजी बैठक पार पडली सदर बैठकीमध्ये जुनी अतिक्रमण सोडून इतर अतिक्रमणे नियमानुसार निष्कासन करण्यात यावेत. निष्कासन करताना न्यायप्रविष्ठ प्रकरणे व इतर प्रकरणात न्यायालयाचे आदेश असल्यास त्यानुसार अतिक्रमण निर्मुलनाची कार्यवाही करावी. नव्याने अतिक्रमण झाल्यास सोसायटीने अपर जिल्हाधिकारी यांचेशी समन्वय साधून तात्काळ अतिक्रमणे निष्कासित करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत.

त्यानुसार सोसायटीकडून वेळो वेळी नव्याने होणाऱ्या अतिक्रमणाची माहिती अपर जिल्हाधिकारी व उपजिल्हाधिकारी (अति/निष्का), तहसीलदार, कुर्ला, वरिष्ठ पोलीस निरीक्षक –गोवंडी पोलीस ठाणे व ट्रॉम्बे पोलीस ठाणे यांना कळविण्यात येते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही

पंचायत समिती केज (जि. बीड) येथील अधिकारी-कर्मचारी निवासस्थानाच्या कामांबाबत

(३९) ९४९४ (१४-०८-२०२५). श्रीमती नमिता मुंदडा (केज) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पंचायत समिती केज (जि.बीड) येथे अधिकारी-कर्मचारी निवासस्थान इमारत बांधकाम पूर्ण झाले असून सदरील इमारतीचे विद्युतीकरणाचे काम झालेले नसल्यामुळे इमारत बांधकाम होऊनही इमारतीचा वापर होत नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी विद्युतीकरण, संरक्षण भिंत बांधकाम, सिमेंट रस्ता व पेवर ब्लॉक बसवणे, बाबतचे ६६,२१,६८५/- लक्ष रुपयांचे अंदाजपत्रक प्रशाकीय मंजुरीसाठी शासनास सादर करण्यात आले आहे हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देणेबाबतची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक ०१ मार्च,२०२५ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन किती रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला वा देण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

श्री. जयकुमार गोरे (१६-०९-२०२५) : (१), (२) व (३) पंचायत समिती, केज (जि. बीड) येथील अधिकारी - कर्मचारी यांच्या शासकीय निवास्थानातील उपकामांस प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचा परिपुर्ण प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर यांसदर्भात प्रचलित कार्यपद्धतीनुसार कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही

चांदापूर हेटी (ता.मूल, जि.यवतमाळ) येथील अंगणवाडीत मुदतबाह्य आहाराचे मुलांना वाटप केल्याबाबत

(४०) ९७०३ (०८-०९-२०२५). श्री.संजय देरकर (वणी) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चांदापूर हेटी (ता.मूल, जि.यवतमाळ) येथील अंगणवाडीत कार्यरत असलेल्या अंगणवाडी सेविकेने मुदतबाह्य आहाराचे लहान मुलांना वाटप केल्याचे माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले , हे खरे आहे काय,
(२)असल्यास, याबाबत बालविकास प्रकल्प अधिकारी, मूल यांचेमार्फत सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(३) असल्यास, सदर चौकशीत काय आढळून व त्यानुषंगाने या प्रकरणात दोषी असलेल्या संबधितावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (२९-०९-२०२५) : (१) अंशत: खरे आहे.

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत ६ महिने ते ३ वर्षे वयोगटातील बालके, गर्भवती महिला आणि स्तनदा माता यांना घरपोच आहार पुरवला जातो. माहे फेब्रुवारी २०२५ या कालावधीतील घरपोच आहार पुरवठा पुरवठाधारकामार्फत विहित कालावधीत पूर्ण करण्यात आला होता. चांदापूर हेटी (ता. मूल) येथील अंगणवाडीत

माहे फेब्रुवारी २०२५ या कालावधीसाठी लाभार्थ्यांना घरपोच आहार पुरवठा करताना, अंगणवाडी सेविकेकडून नजरचुकीने अंगणवाडीत शिल्लक असलेली मुदतबाह्य (expiry) झालेली आहाराची पाकिटे दोन लाभार्थ्यांना वाटण्यात आली. दुसऱ्या दिवशी मुलांनी सदर पाकिटातील खिचडीचे सेवन केल्यानंतर दीड तासाने त्यांना मळमळ सुरू झाली. त्यानंतर लाभार्थ्यांच्या मातेनी हा माल मुदतबाह्य झाल्याचे अंगणवाडी सेविकेच्या निदर्शनास आणून दिले. अंगणवाडी सेविकेने तातडीने ती मुदतबाह्य झालेली आहाराची पाकिटे ताब्यात घेऊन, विहित मुदतीची नवीन घरपोच आहाराची पाकिटे लाभार्थ्यांना वितरीत केली आहेत.

(२) व (३) बाल विकास प्रकल्प अधिकारी, मूल यांच्यामार्फत सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे. चौकशीअंती अंगणवाडी सेविकेमार्फत सदर प्रकरणी कामकाजात दुर्लक्ष झाल्याचे दिसून येत आहे. घरपोच आहाराचे वितरण करताना अंगणवाडी सेविकांनी सदर माल विहित मुदतीचा आहे किंवा कसे याची तपासणी करूनच, घरपोच आहाराचे वितरण लाभार्थ्यांना करणे आवश्यक आहे. त्यामुळे, संबंधित अंगणवाडी सेविकेला कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली होती. त्यानुसार खुलासा प्राप्त झाल्यानंतर संबंधित अंगणवाडी सेविकेला अंतिम संधी/सक्त ताकीद देण्यात आली आहे. तसेच, भविष्यात अशा प्रकारची वर्तणूक झाल्यास अंगणवाडी सेविकेला कोणतीही पूर्वसूचना न देता तात्काळ मानधनी सेवेतून कमी करण्यात येईल, असे लेखी आदेश बजावण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही

राज्यात रस्त्यांवर राहणाऱ्या बालकांच्या पुनर्वसनासाठी “फिरते पथक” ही योजना राबविणेबाबत

(४१) १०१८३ (०८-०९-२०२५). श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.महेंद्र थोरवे (कर्जत) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रस्त्यांवर राहणाऱ्या हजारो बालकांना शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि नवजीवनाची संधी मिळावी यासाठी या मुलांच्या पुनर्वसनासाठी “फिरते पथक” ही योजना नियमित स्वरुपात राबविण्यात येणार आहे ,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील २९ महानगरपालिकामध्ये प्रत्येकी एक व मुंबई महानगरपालिकेमध्ये पूर्व व पश्चिम उपनगरांसाठी प्रत्येकी एक अशी ३१ फिरती पथके सुरु करण्यात येणार असून आगामी काळात याची व्याप्ती राज्यभर वाढविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मुलांच्या गरजांनुसार वैयक्तिक पुनर्वसन आराखडा तयार करण्यात येणार आहे काय,

(४) असल्यास, मुलांना त्यांच्या वयाप्रमाणे अंगणवाडी, तसेच शाळांमध्ये प्रवेश, आरोग्य तपासणी, लसीकरण, पोषण आहार, औषोधोपचार, व्यसनमुक्तीसाठीची कामे लवकरात लवकर सुरु होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय ,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (२९-०९-२०२५) : (१) (२) (३) व (४) होय, हे खरे आहे,

रस्त्यावर राहणा-या मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फिरते पथक ही योजना कायमस्वरुपी राबविण्याबाबतचा शासन निर्णय दि. १९ जून, २०२५ रोजी निर्गमित करण्यात आला असून सदर योजनेसाठी स्वतंत्र लेखाशिर्ष घेण्याबाबत शासनस्तरावर कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

अंकुशवीहीर (ता.अक्कलकुवा,जि.नंदूरबार) अंतर्गत येणाऱ्या बाबानगर अंगणवाडी केंद्रात मयत अंगणवाडी मदतनीसच्या नावे परस्पर मानधन घेण्यात येत असल्याबाबत

(४२) १०२६३ (०८-०९-२०२५). श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंकुशवीहीर (ता.अक्कलकुवा,जि.नंदूरबार) अंतर्गत येणाऱ्या बाबानगर अंगणवाडी केंद्रावर श्रीमती शांता जयंतलाल तडवी या मदतनीस म्हणून कार्यरत असून त्यांना दिनांक १ सप्टेंबर,१९९६ रोजी रु ५० मानधनावर पहिली नियुक्ती देण्यात असून दिनांक २८ जून,२००६ रोजी रु.७४० मानधनावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने दुसरी नियुक्ती देण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्रीमती शांता तडवी यांचे सेवेत असताना दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी निधन झाले असून त्याच्या निधनानंतर बालविकास प्रकल्प अधिकारी, पर्यवेक्षिका यांनी संगनमत करून सदर महिला मयत न दाखवता त्यांच्या जागी त्यांच्या नावांवर दुसऱ्या महिलेला कामावर ठेवून त्या महिलाच फोटो लावून नवीन नियुक्ती मिळालेल्या महिलेच्या बँक खात्यावर मानधन जमा करून काढून घेतले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार शासनाची दिशाभूल करून दुसऱ्या महिलेच्या नावाने मानधन काढणारे बालविकास प्रकल्प अधिकारी व पर्यवेक्षिका यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात आली आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (३०-०९-२०२५) :(१) अंशतः खरे आहे.

सदर नियुक्ती ही मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्वाक्षरीने नसून बाल विकास प्रकल्प अधिकारी यांच्या स्वाक्षरीने देण्यात आली आहे.

श्रीमती शांता जयंतीलाल तडवी यांना अंगणवाडी केंद्र बाबा नगर येथे दिनांक ०१ सप्टेंबर, १९९६ रोजी रु. ५० मानधनावर मदतनीस म्हणून नियुक्ती देण्यात आली होती. तद्नंतर त्यांना अंगणवाडी केंद्र बाबानगर या नियमित अंगणवाडी केंद्रामध्ये दिनांक २८ जून २००६ रोजी रु. ७४० मानधनावर अंगणवाडी मदतनीस म्हणून नियुक्ती देण्यात आली होती.

(२) अंशतः खरे आहे.

श्रीमती शांता जयंतीलाल तडवी यांचे सेवेत असताना दिनांक ११ ऑक्टोबर, २०२४ रोजी दुख:द निधन झाले.

तथापि, श्रीमती सुमित्रा रोहिदास तडवी ह्या बनावट कागदपत्र तयार करून श्रीमती शांता जयंतीलाल तडवी यांच्या नावाने अंगणवाडी केंद्र, बाबानगर येथे दिनांकच १ सप्टेंबर १९९६ पासून काम करत होत्या. श्रीमती सुमित्रा तडवी यांनी बनावट कागदपत्रांच्या आधारे बँक खाते, आधार कार्ड तयार करून अंगणवाडी मदतनीस पदाचे मानधन घेतले असल्याचे चौकशी दरम्यान मान्य केले आहे. तसेच चौकशी दिनांकानंतर सुमित्रा रोहिदास तडवी यांना अंगणवाडी केंद्रात कामकाज करण्यास प्रतिबंध करण्यात आलेला आहे.

(३) हे खरे आहे.

सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली असून चौकशी दरम्यान श्रीमती सुमित्रा रोहिदास तडवी यांनी बनावट कागदपत्र तयार करून श्रीमती शांता जयंतीलाल तडवी यांच्या नावाने अंगणवाडी केंद्र बाबा नगर येथे काम केले असल्याचे मान्य केले आहे. त्यानुसार श्रीमती सुमित्रा रोहिदास तडवी यांच्या विरुद्ध अक्कलकुवा पोलीस स्टेशन (ता. अक्कलकुवा) येथे दिनांक २० मे, २०२५ रोजी प्रथम खबर अहवाल (FIR) क्रमांक ०२०९ नोंदवण्यात आला आहे.

तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी यांचा प्रकल्प अक्कलकुवा येथील अतिरिक्त कार्यभार काढण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

खेड (जि.पुणे) तालुक्यातील घनकचरा व्यवस्थापनास जागा उपलब्ध करून देण्याबाबत

(४३) १०३०३ (१४-०७-२०२५). श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) **खेड (जि.पुणे) तालुक्यातील** ग्रामपंचायतींना घनकचरा व्यवस्थापन अनुषंगाने जागा उपलब्ध करून देण्यात आली नाही हे खरे आहे काय,

(२) असल्यास,यामुळे NGT -६०६/२०१८ आदेशाचा भंग झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,खेड तालुक्यातील किती ग्रामपंचायतींना घनकचरा व्यवस्थापनाच्या अनुषंगाने जागा उपलब्ध करून देण्यात आली व किती ग्रामपंचायतींचे जागेचे प्रस्ताव प्रलंबित आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन घनकचरा व्यवस्थापनास जागा उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (२५-०९-२०२५) : (१) होय, हे अंशतः खरे आहे,

(२) हे खरे नाही,

(३) एकूण ७५ ग्रामपंचायतींना घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत जागा मागणी करणे आलेली होती, पैकी ०५ ग्रामपंचायतींना जागा उपलब्ध झालेली असून,६० ग्रामपंचायतींनी पर्यायी जागा उपलब्ध करून घनकचरा व्यवस्थापन संकलनाची कामे पूर्ण केलेली आहेत.०२ ग्रामपंचायतींना जागा उपलब्ध नाही तसेच ०३ ग्रामपंचायतींचे घनकचरा व्यवस्थापन संकलनाची कामे प्रगती पथावर चालू असून उर्वरित ०५ ग्रामपंचायतींना नव्याने जागा मागणी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

(४) उर्वरित ०५ ग्रामपंचायतींना नव्याने जागा मागणी प्रस्ताव प्रस्तावित आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही

मुंबई शहर व उपनगरांतील उघड्यावर राहणाऱ्या श्रमिक बेघर कुटुंबातील मुलांना एकात्मिक सेवा योजनेतंर्गत पोषण आहाराचे लाभ देण्याबाबत

(४४) १०९२९ (०८-०९-२०२५). श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

१) मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये सोळाशेहून अधिक कुपोषित मुलांची नोंद झाल्याच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावर राहणाऱ्या तसेच बेघर मुलांनाही पोषण आहाराचा लाभ देण्याची मागणी (सीपिडी childrean development project) बाल विकास प्रकल्प संस्थेमार्फत करण्यात आली असल्याचे दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

२) असल्यास, या मुलांना एकात्मिक सेवा योजनेअंतर्गत पोषण आहाराचा लाभ देण्याची मागणी करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार उघड्यावर राहणाऱ्या श्रमिक, बेघर

कुटुंबातील मुलांची आरोग्य तपासणी, त्यांना अंगणवाडी केंद्रामध्ये नियमित आणणे तसेच कुपोषित बालकांना विशेष आहार देण्यासाठी कोणत्या उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (३०-०९-२०२५) :

(१), (२) व (३) एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी केंद्राच्या माध्यमातून दाखल सर्व लाभार्थ्यांना पोषण आहार उपलब्ध करुन देण्यात येतो.

तसेच, महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय, दिनांक १९ जून, २०२५ अन्वये रस्त्यावर राहणा-या मुलांना समाजाच्या व शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फिरते पथक ही योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार या मुलांना अंगणवाडी सेवा देणे सुलभ होणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

दौंड (जि. पुणे) तालुक्यातील श्री शंभो महादेव देवस्थान, राहु व श्री भानोबा मंदिर देवस्थान कुसेगाव यांना "ब" वर्ग देवस्थानाचा दर्जा मिळणेबाबत

(४५) ११३२० (३०-०७-२०२५). श्री.राहूल कुल (दौंड) : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दौंड (जि. पुणे) तालुक्यातील श्री शंभो महादेव देवस्थान, राहु व श्री भानोबा मंदिर देवस्थान कुसेगाव यांना "ब" वर्ग देवस्थानाचा दर्जा मिळणेबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी ग्रामविकास मंत्री यांना माहे मे, २०२५ मध्ये केली आहे.

(२) असल्यास, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना प्रस्ताव सादर करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय चौकशी अंती काय आढळून आले त्याअनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. जयकुमार गोरे (०३-१०-२०२५) :(१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांना दि. २५.०६.२०२५ रोजीच्या व स्मरणपत्र दि. १९.०९.२०२५ रोजीच्या पत्रान्वये आवश्यक कागदपत्रांसह प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव शासनास अद्याप अप्राप्त आहे. प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करणे शक्य आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

जेजुरी एमआयडीसी विस्तारीकरण टप्पा क्रमांक ४ व ५ च्या भूसंपादन प्रक्रियेबाबत

(४६) १२२९७ (३०-०७-२०२५). श्री.विजयबापू शिवतारे (पुरंदर) : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेजुरी (ता.पुरंदर, जि.पुणे) एमआयडीसी विस्तारीकरण टप्पा क्रमांक ४ व ५ साठी संपादनाची प्रक्रिया गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन शेतकऱ्यांना समाधानकारक दर देऊन तातडीने भूसंपादनाची कार्यवाही करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. उदय सामंत (०६-१०-२०२५) :(१) व (२)

जेजुरी औद्योगिक क्षेत्रालगत प्रस्तावित टप्पा क्र. ४ साठी १७१.५९ हे. आर क्षेत्र संपादन प्रस्तावासंदर्भात दि.०३/०४/२०१० रोजी प्रस्तावित जागेची पहाणी करुन सदर क्षेत्रातील जमिन काळी कसदार असून त्यामध्ये बागायती पिके घेतली जातात. सदर जमिनी संपादन केल्यास घरांचे पुर्नवसन करावे लागणार असून बागायती जमिनी संपादन करणेस संबंधीत खातेदारांचा विरोध असल्याने सदर प्रस्ताव महामंडळाच्या स्तरावर रद्द केलेला आहे.

जेजुरी औद्योगिक क्षेत्र टप्पा क्र. ५ साठी मौजे कोळविहिरे,नावळी व मावडी कडेपठार, ता.पुरंदर,जि.पुणे येथील खाजगी २६३२.९५ हे.आर व सरकारी २१.४६ हे.आर असे एकूण २६५४.४१ हे.आर क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले. सदर क्षेत्रासाठी प्रकरण ची अधिसूचना दि.२१.०४.२०११ रोजी लागू करण्यात आली. तसेच कलम ३२ (२) ची अधिसूचना दि.२१.२७-०१.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

सदर क्षेत्रातील मौजे मावडी कडेपठार येथील क्षेत्राची स्थळ पाहणी सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन), मऔविम यांच्या अध्यक्षतेखलील भूनिवड समितीने दि. १४/०९/२०२३ रोजी केली. भूनिवड समितीच्या अहवालानुसार

अ) मौजे मावडी कडेपठार येथील जवळपास संपूर्ण क्षेत्र खाजगी ९६५.०२ हे.आर क्षेंत्र (७०.१८%) बागायती क्षेत्र असल्याचे दिसून आले आहे. तसेच उर्वीरत क्षेत्र तुकड्यामध्ये विखुरलेल्या स्वरूपात असल्याने संपादन करणे उचित होणार नाही.

ब) तसेच पूर्ण अधिसूचित क्षेत्र पुरंदर उपसा सिंचन योजना व नाझरे मध्यम प्रकल्प योजनेद्वारे सिंचनाखाली येत असल्याने स्थानिक ग्रामस्थ व शेतकऱ्याचा भूसंपादनास तीव्र विरोध आहे.

क) मौजे मावडी कडेपठार येथील संपूर्ण क्षेत्र हे प्रस्तावित जेजुरी टप्पा क्र.५ च्या एका बाजूला असल्याने, सदर क्षेत्र विनाअधिसुचीत केल्यास उर्वरित प्रस्तावित जेजुरी टप्पा क्र.५ चे संपादनाचे सलगतेसाठी कोणतीही बाधा येत नाही.

ड) मौजे मावडी कडेपठार येथील खातेदारांची संपादनास सहमती प्राप्त नाही.

मौजे मावडी कडेपठार येथील संपूर्ण अधिसूचित क्षेत्र विनाअधीसुचीत करण्यात यावे असे भूनिवड समितीचे मत असल्याने त्यानुषंगाने मऔवि महामंडळाकडून सदर संपूर्ण खाजगी ९६५.०२ हे.आर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याबाबतचा प्रस्ताव दि.०७.०३.२०२४ रोजीच्या उच्चाधिकार समितीच्या १६२ व्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात आला आला. उच्चाधिकार समितीने सदर क्षेत्र विनाअधिसूचीत करण्यास तत्वत: मान्यता प्रदान केली. त्यानुसार सदर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याबाबत दि.२८.०८.२०२४ रोजीच्या शासन राजपत्रात अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे.

तसेच मौजे कोळविहिरे येथील ६१३.६३ हे.आर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याबाबत बक्षी समितीने दिलेल्या निर्देशानुसार सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन), मऔविम यांच्या अध्यक्षतेखालील भूनिवड समितीने दि. १४/०९/२०२३ रोजी स्थळपाहणी केली असून, सदर क्षेत्र विनाअधिसूचित करण्याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील तरतुदी व मऔवि महामंडळाच्या कार्यपध्दतीनुसार पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही

पिंपरी चिंचवड शहरासह राज्यातील सर्व बालसंगोपन केंद्र, अनाथआश्रम, आणि वसतिगृहांची तपासणी करणेबाबत

(४७) १२३७९ (०८-०९-२०२५). श्री.शंकर जगताप (चिंचवड) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पिंपरी चिंचवड शहरात अनेक ठिकाणी बालसंगोपन संस्था, अनाथ आश्रम आणि वसतिगृह नियमबाह्यरित्या सुरू आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अनाधिकृत संस्थेमध्ये बालकांवर शारीरिक, मानसिक आणि लैंगिक शोषणाच्या गंभीर घटना घडत असल्याचे निदर्शनास येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पिंपरी -चिंचवड शहरात बेकायदा सुरू असलेल्या बालसंगोपन संस्था, अनाथ आश्रम आणि वसतीगृहामधील बालकांचे शोषण रोखण्याकरिता व बालकांच्या हक्कांचे रक्षण करण्याकरिता बाल न्याय कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरिता पिंपरी चिंचवड शहरासह राज्यातील सर्व शहरातील सर्व बाल संगोपन केंद्र, अनाथ आश्रम,आणि वसतीगृहांची तपासणी करण्याचे आदेश देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (०६-१०-२०२५) : (१) होय, हे खरे आहे,

(२) होय, हे खरे आहे.

(३) संपुर्ण राज्यामध्ये विना परवानगी कोणतेही बालगृह, अनाथाश्रम अथवा वसतिगृह चालविणे अनधिकृत असल्याचे आयुक्तालय, महिला व बाल विकास आयुक्तालय, पुणे यांच्यामार्फत निवेदन प्रसिध्द करुन त्यामध्ये दंडात्मक कारवाई करण्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तसेच अशा अनधिकृत संस्था निदर्शनास आल्यास तात्काळ जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयास संपर्क साधणे बाबत सर्व जनतेला आव्हान करण्यात आलेले आहे.

तसेच राज्यातील बालकांच्या अनधिकृत संस्थाविरोधात कठोर कारवाई करण्याबाबत आयुक्त महिला व बाल विकास पुणे यांच्या दि. १६.४.२०२५ रोजीच्या पत्रान्वये पोलीस महासंचालक मुंबई, सर्व पोलीस आयुक्त, सर्व पोलीस अधिक्षक यांना कळविण्यात आले आहे.

यात्यतिरिक्त धर्मदाय आयुक्त पुणे यांना आयुक्तालयाचे दिनांक २५.३.२०२५ च्या पत्रान्वये अनधिकृत बालगृह, वसतिगृहांच्या मान्यता रद्द करणे बाबत कळविण्यात आलेले आहे. तसेच विभागामार्फत कार्यरत असलेले सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी (जिल्हा परिषद) आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सर्व यांना सुध्दा अनधिकृत बालगृहे वसतिगृहांचा शोध घेवून त्यांचेवर कारवाई करणे बाबतच्या सुचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

मौजे केडगाव (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे शासकीय कुष्ठधाम अधिकारी व कर्मचा-यांसाठी निवासी वसाहत बांधणेबाबत

(४८) १२९३० (०८-०९-२०२५). श्री.नारायण (आबा) गोविंदराव पाटील (करमाळा) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे केडगाव (ता.करमाळा, जि.सोलापूर) येथे महिला व बालकल्याण विभागांतर्गत शासकीय कुष्ठधाम अधिकारी व कर्मचा-यांसाठी निवासी वसाहत बांधण्यासाठीचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद

बांधकाम विभाग, सोलापूर यांचेकडून संबंधित विभागाकडे सादर केलेला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यात यावी अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २० मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास मा. मंत्री, महिला व बाल विकास यांचेकडे लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली आहे काय,असल्यास, याबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (२९-०९-२०२५) : (१) होय, हे खरे आहे,
(२) होय, हे खरे आहे.
(३) उप अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग यांचेकडून प्राप्त बांधकामाचे अंदाजपत्रकास आयुक्त, महिला व बालविकास यांनी दि.२८/०५/२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रशासकीय मान्यता दिली असून निधी मागणीचा प्रस्ताव जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, सोलापूर यांचेकडून जिल्हा नियोजन समिती सोलापूर यांचेकडे दि.१९/०५/२०२५ रोजी सादर करण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

राज्य महिला आयोगातील अशासकीय सदस्यांची रिक्त पदे भरणेबाबत

(४९) १३२३७ (०८-०९-२०२५). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य महिला आयोगात अध्यक्ष व पोलीस महासंचालकांखेरीज सहा अशासकीय सदस्य नेमण्याचा नियम असून सदर अशासकीय सदस्यांची निवड अनेक महिन्यापासून प्रलंबित असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर आयोगाला मंजूर ३५ पदापैकी १८ पदे रिक्त असून आयोग कार्यालयात दैनंदिन सरासरी ७५ महिलांच्या प्रत्यक्ष तक्रारी प्राप्त होत असताना त्या तक्रारींवर सल्ला देण्यासाठी आयोगामध्ये फक्त तीन समुपदेशक कार्यरत असल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर आयोगाने सन २०१८ नंतर संकेतस्थळावर वार्षिक अहवाल सादर केलेला नसल्याचे देखील निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी करुन सदरील आयोगातील रिक्त पदे भरण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
कुमारी आदिती तटकरे (०९-१०-२०२५) :(१) महाराष्ट्र राज्य महिला आयोगावर अशासकीय सदस्यांची नेमणूक करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.
(२)महाराष्ट्र राज्य महिला आयोग कार्यालयाकरिता एकूण ३५ पदे मंजूर असून त्यापैकी नियमित १८ व बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी तत्वावर १७ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत राज्य महिला आयोगातील कोणतेही पद रिक्त नाही.
(३)महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचे सन २०२१-२०२२ पर्यंतचे वार्षिक अहवाल आयोगाच्या संकेतस्थळावर सादर करण्यात आले आहेत. पुढील वार्षिक अहवालांबाबत कार्यवाही सुरु आहे.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

अंगणवाडीतील पोषण आहारासंदर्भात नव्या धोरणात बदल करण्याचा निर्णय रद्द करणेबाबत

(५०) १३४४२ (०८-०९-२०२५). श्री.बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर) (परतूर) : सन्माननीय **महिला व बालविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र व राज्य शासनाच्या महिला व बालकल्याण विभागाने अंगणवाडीतील पोषण आहारासाठीचे सध्या असलेले धोरण बदलण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थित शालेय पोषण आहार योजना महिला बचत गटामार्फत प्रति विद्यार्थी रु.८ प्रमाणे अंगणवाडीत ताजा पोषण आहार पोहोचविण्याचे काम करीत आहेत मात्र येऊ घातलेले नवे धोरण बचत गटांसाठी नुकसानकारक ठरणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लवकरच या पोषण आहारासाठी खुल्या निविदा काढल्या जाणार असून या नव्या धोरणामुळे बचत गटाच्या पाच लाख महिलांचा रोजगार हिरावला जाण्याची भीती असल्याने यास राज्यातील महिला बचत गटांचा तीव्र विरोध आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या नव्या धोरणामुळे राज्यातील बड्या कंपन्या या आहाराच्या स्पर्धेत पात्र ठरतील त्याच वेळी बचत गटांचे छोटे समूह मात्र या स्पर्धेतून बाद होतील परिणामी त्यांच्या हातचा रोजगार हिरावला जाईल, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, 'एकरकमी मार्जिन' मिळण्यासाठी या प्रक्रियेत बड्या कंत्राटदार कंपन्या सहभागी व्हाव्यात यासाठी महिला व बालकल्याण विभागातील काही अधिकारी वर्गास स्वारस्य (इंटरेस्टेड) आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार या नव्या धोरणात बदल करण्याचा निर्णय रद्द करून महिला बचत गटांना पोषण आहाराचे कंत्राट देण्याबाबत कोणते प्रयत्न करण्यात येणार आहेत, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

कुमारी आदिती तटकरे (३०-०९-२०२५) : (१),(२),(३),(४) व (५) हे खरे नाही.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

विधान भवन :
नागपूर.

जितेंद्र भोळे
सचिव-१,
महाराष्ट्र विधानसभा.

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.